# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.

## दिनांक २४.११.२००५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

गुरूवार दिनांक २४ नोव्हेंबर २००५ रोजी मा.महापौर श्री.किशनचंद लेखराज तनवाणीानी यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह'' येथे दुपारी ३.३० वाजता''वंदेमातरम्''या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.भगवान घडमोडे
०२. स.स.श्री.काशिनाथ कोकाटे
०३. स.स.श्री.संजय शिरसाट
०४. स.स.श्री.तरविंदरसिंग धिल्लन
०५. स.स.श्री.बम्हणे पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सिताराम इसराम
०७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०८. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०९. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
१०. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
११. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
१२. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
१३. स.स.श्री.खान सलिम खान यासीन
१४. स.स.श्रीमती पाटील अलका रमेश
१५. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१६. स.स.सौ.मसरद बेगम शरफोद्दीन
१७. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१८. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१९. स.स.सौ.रजनी रमेश जोशी
२०. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
२१. स.स.सौ.इंगळे शंकुतला सांडुजी
२२. स.स.सौ.रगडे सुशिला भगवान
२३. स.स.श्रीमती शिंदे मिराबाई रामराव
२४. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२५. स.स.सौ.खान मेहेरून्नीसा खान हमीद
२६. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
२७. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
२८. स.स.सौ.यास्मिन बेगम अ.कदिर
२९. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन
३०. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्यीन
३१. स.स.श्री.अ.रशिद खान मामु
३२. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल

३३. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग
३४. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
३५. स.स.श्री.खान कैसर बद्रोद्दीन
३६. स.स.सौ.कुरैशी नजमा बेगम युनूस
३७. स.स.श्री.खान मुजीब मीर आलमखान
३८. स.स.श्री.खान निसार मो.खान
३९. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
४०. स.स.सौ.खान आबेदा बेगम गुलाब खान
४१. स.स.सौ.राऊत छाया विलास
४२. स.स.श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
४३. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४४. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४५. स.स.सौ.शेख शमशाद बेगम शेख हफीज
४६. स.स.श्री.जेजुरकर संतोष सुधाकरराव
४७. स.स.श्री.पटेल सलिम समशेर पटेल
४८. स.स.श्री.मोतीवाला अशरफ म.युनुस
४९. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
५०. स.स.श्री.कटकटे सतीष विश्वनाथ
५१. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
५२. स.स.श्री.कराड भागवत किसनराव
५३. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५४. स.स.श्री.वैद्य रेणुकादास दत्तोपंत
५५. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
५६. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५७. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
५८. स.स.श्रीमती डॉ.बिनवडे आशा उत्तम
५९. स.स.श्री.खुडे विजय किसन
६०. स.स.श्री.खेंडके संतोष सर्जेराव
६१. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
६२. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
६३. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
६४. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
६५. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
६६. स.स.श्री.कावडे साहेबराव राणुबा
६७. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
६८. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६९. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
७०. स.स.श्रीमती वाघमारे पार्वताबाई विजय
७१. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
७२. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
७३. स.स.सौ.खंदारे वंदना प्रकाश
७४. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप

७५. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७६. स.स.सौ.विजया किशोर रहाटकर
७७. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
७८. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
७९. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
८०. स.स.सौ.जैन अल्पा विकास
८१. स.स.सौ.मोमीन सफीया फिरदोस
८२. स.स.सौ.घोडेले अनिता नंदकुमार

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.केनेकर संजय किसनराव
०२. स.स.श्री.किशोर बाबुलाल तुलशीबागवाले
०३. स.स.श्री.राजेश व्यास
०४. स.स.श्री.सुरेंद्र कुलकर्णी

**चर्चा :**

श्री.संजय जगताप : स.सदस्य श्री. कैलास गायकवाड यांचे वडील स्व. लक्ष्मण गायकवाड यांचे नुकतेच दु:खद निधन झालेले आहे. त्यांना सभागृहातर्फे श्रध्दाजंली अर्पण करण्यात यावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:यास माझे अनुमोदन आहे.

डॉ. भागवत कराड : भारताचे माजी राष्ट्रपती स्व. के.आर. नारायनण तसेच व संसद पटू स्व.प्रा. मधू दंडवते यांचेही नुकतेच निधन झालेले आहे त्यांनाही श्रध्दाजंली अर्पण करण्यात यावी.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : यास माझे अनुमोदन आहे.

मा.महापौर : ठिक आहे सर्वांनी श्रध्दाजंलीसाठी उभे रहावे.

याच वेळी स्व. लक्ष्मण गायकवाड तसेच स्व. माजी राष्ट्रपती श्री.के.आर. नारायनण तसेच स्व. प्रा .मधु दंडवते यांना सभागृहातर्फे दोन मिनिटे श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

श्री.अ.रशीद खान : मा.श्री. नारायण राणे हे पहील्यांदा मोठया मताधिक्याने विजयी झालेले असून ते महाराष्ट्र शासनाच्या मंत्रीमंडळात एक मंत्री म्हणून कार्यरत आहे. त्यांनी या शहराच्या गुंठेवारीसाठी मदत होईल. त्यांचा अभिनंदनाचा ठराव पारीत करावा.

श्री.रेणुकादास वैद्य : ज्यांना कुणाला त्यांचे अभिनंदन करायचे त्यांनी वैयक्तिक रित्या किंवा त्यांचे मतदार संघात जावून करावे. असा ठराव पारीत करता येणार नाही.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: एक तर अभिनंदनाचा ठराव मंजूर करावा नसता मंजूर करीत नाही म्हणून तसा खुलासा करावा.

श्री.काशिनाथ कोकाट : संयूक्त महाराष्ट्राच्या ५० व्या वर्धापन दिनीच मराठी अस्मितेवर घाला घालून बेळगाव महानगरपालिकेचे महापौर उपमहापौर यांचेवर व त्यांचे सोबत असलेले लोकप्रतिनिधी यांचेवर जो भ्याड हल्ला करण्यात आला. त्या संदर्भात कर्नाटक सरकारने संबधीत हल्लेखोर जे आहे त्यांचेवर कार्यवाही न करता उलट बेळगाव महानगरपालिका बरखास्त करून बेळगाव महानगरपालिका ही अत्यंत लोकशाही मार्गाने चालू होती ती बरखास्त करण्याचा जो निर्णय कर्नाटक सरकारने घेतला त्यामूळे महापौर उपमहापौर यांचा अपमान झालेला आहे म्हणून कर्नाटक सरकारने संयुक्त महाराष्ट ५० व्या वर्धापण दिनी मराठी माणासाच्या अस्तित्वतेवर हात घालून अन्याय केला आहे.हा ऐनवेळचा निषेधाचा ठराव मंजूर करण्यात

यावा.आणि या निषेधाच्या ठरावाची प्रत कर्नाटकचे मुख्यमंत्री तसेच राज्यपाल यांना पाठविण्यात यावी.

सौ. लता दलाल :आताच जो ठराव स.सदस्य श्री. कोकाटे काशिनाथ यांनी महाराष्ट एकीकरण समितीचे बेळगाव महानगरपालिकेचे मा. महापौर उपमहापौर याचेवर झालेल्या भ्याड हल्ल्याच्या संदर्भात संबधीत हल्लेखोरावर कर्नाटक सरकारचे कार्यवाही न करता उलट बेळगाव महानगरपालिका बरखास्त केली त्यात निषेधाचा ठराव मंजूर करावा. जो निषेधाचा ठराव मांडलेला आहे तो मंजूर करावा,त्यास माझे अनुमोदन आहे. शिवसेना तर्फे या घटनेचा धिक्कार करण्यात येतो.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:स.सदस्य. श्री. अ. रशीद खान मामू यांनी मांडलेला अभिनंदनाचा ठराव सुध्दा पारीत करावा.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :श्री. कोकाटे यांनी जो निषेधाचा ठराव मांडला तो मंजूर होत असेल तर श्री. राणे यांचे बाबतीतला ही अभिनंदनाचा ठराव मंजूर करावा.

सौ. लता दलाल :श्री. राणे यांचे अभिनंदनाचा ठराव घेणे हा विषय महानगरपालिकेचा होवू शकत नाही. बेळगावचे महापौर उपमहापौर हे महानगरपालिका संबधीत आहे.महाराष्ट एकीकरण समितीचा अस्मितेचा प्रश्न आहे म्हणून निषेधाचा ठराव मंजूर करावा.

डॉ. भागवत कराड :बेळगाव महानगरपालिका कर्नाटक सरकारने बरखास्त केली व महापौर उपमहापौर यांचा जो अपमान केला त्याबध्दल त्या सरकारचा निषेधाचा ठराव पारीत करावा.बाकी इतर कोणतेही ठराव घेवू नये.

श्री.अ.रशीद खान :बेळगावचे महानगरपालिकेचे महापौर उपमहापौर यांचा अपमान झाला हे मान्य आहे .परंतू श्री.नारायण राणे हे महाराष्ट शासनाच्या मंत्री मंडळात मंत्री आहे. महानगरपालिकेच्या संबधीत आहे. जनतेने त्यांना मोठया मताधिक्याने निवडून दिलेले आहे. त्यांचा अभिनंदनाचा ठराव पारीत करावा.

श्री.कोकाटे काशिनाथ :सभागृहाचे मत लक्षात घेता फक्त कर्नाटक सरकारचा निषेधाचा ठराव पारीत करावा. इतर कोणताही ठराव मंजूर करण्यात येवू नये.

मा.महापौर :सभागृहाचे मत लक्षात घेता कर्नाटक सरकाचा जो निशेघाचा ठराव ठेवला त्यात मंजूरी देण्यात येते.

याच वेळी मा.महापौर डायस समोर स.सदस्य जावून अभिनंदनाचा ठराव पण मंजूर करावा म्हणून मागणी करतात.व मोठमोठयाने बोलतात, काही ऐकू येत नाही.

मा.महापौर :सर्व सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे .

श्री.अ.रशिद खान :मुंबईमधे प्रिया दत्त हया सुध्दा खासदार म्हणून मोठया मताधिक्याने निवडून आलेल्या आहे. त्या महिला खासदार आहे. त्यांचाही अभिनंदनाचा ठराव पारीत करावा.

श्री.संजय केनेकर :बिहार मधे एन.डी. ए चे सरकार आले त्यांचा सुध्दा अभिनंदनाचा ठराव पारीत करावा.

श्री.संजय सिरसाट :शहरात अत्यंत ज्वलंत प्रश्न पार्कींगच्या संदर्भात चालू आहे.आताच बेळगाव महानगरपालिकेचे महापौर उपमहापौर यांचा महानगरपालिका बरखास्त केल्यामुळे अपमान झाला कर्नाटक सरकारचा निषेधाचा निषेधाचा ठराव घेतला. ज्यांचा कुणाचा महानगरपालिकेशी संबध नाही अशाचा अभिनंदनाचा ठराव घेणे बरोबर नाही.मागिल एका बैठकीत मी मुद्या मांडला होता की,श्रध्दाजंली अर्पण करतांना जे कुणी स.सदस्य किंवा त्यांचे जे नातेवाईक यांचे निधन झाले असतील त्यांनाच श्रध्दाजंली अर्पण केली पाहिजे.परंतु या सभागृहात प्रथाच पडली की ज्याचा महानगरपालिकेशी संबध नाही अशाही व्यक्तींना श्रध्दाजंली व अभिनंदनाचा ठराव

घेतला जातो ही अत्यंत चुकीची पध्दत आहे असे माझे मत आहे.ज्या ठिकाणी ज्यांचा विजय झाला तेथे अभिनंदन केलेलेच असेल. फटाके वाजवलेच असतील. त्यामूळे तो विषय या सभागृहाचा होवू शकत नाही.शहराच्या संबधीत जे काही प्रश्न असतील कृपया त्यावर चर्चा करावी.या शहराचे स्थानिक आमदार श्री.दर्डा साहेब निवडून आले तेंव्हा अभिनंदनाचा ठराव कॉग्रेस पक्षाच्या सदस्यांनी मांडला नाही . .श्री.नारायण राणे हे निवडून आले त्यांचे अभिनंदनाचा ठराव ठेवण्याचे कारण काय कळायला मार्ग नाही. त्यासाठी या शहराच्या अंतर्गत येणारे जे कुणी असतील त्यांचे बाबतीतच श्रध्दाजंली व अभिनंदनाचे ठराव घेण्यात यावे.इतर ठिकाणी काय झाले याचा विचार करू नये.

श्री.अ.रशीद खान :आजपर्यत कुणाचे डिपॉजीत जप्त झालेले नव्हते. श्री.नारायण रानेच्या स्पर्धेत जे उभे होते त्याचे डिपॉजीत जप्त झालेले आहे.

श्री.दत्तभाऊ पाथ्रीकर :श्री. नारायण राणे यांचा अभिनंदनाचा ठराव घेणार नसाल तर` धोरण ठरवावे की यापूढे औरंगाबाद व मराठवाडयाच्या व्यतिरिक्त कुणाचाही अभिनंदनाचा ठराव पास करू नये. यापूर्वी अभिनंदन करण्याचे निर्णय या सभागृहाने घेतलेले आहे. अभिनंदन केल्यास कमी पणा नसतो. त्यासाठी मोठे मन करण्यास हरकत नसावी.

डॉ.भागवत कराड :या महानगरपालिकेत शिवसेना भाजपा पार्टीची सत्ता आहे. श्री. नारायण राणे हे विरूध्द पार्टीचे उमेदवार आहे. त्यामूळे त्यांचा येथे अभिनंदनाचा ठराव घेणे बरोबर नाही. आमचा त्यास पाठींबा नाही.

मा.महापौर :आताच जो श्री. राणे व प्रिया दत्त यांचा अभिनंदनाचा ठराव ठेवला तो फेटाळण्यात येतो.

याच वेळी मा.महापौर डायस समोर स.सदस्य मोठमोठयाने बोलतात. काहीही ऐकू येत नाही.

श्री.भगवान घडमोडे :या सभागृहात जनतेने विकास कामे करण्यासाठी पाठविलेले आहे त्यावर चर्चा होणे गरजेचे आहे. जे जेष्ठ स.सदस्य आहे त्यांचेकडून मार्गदर्शन मिळेल असेच वर्तन त्यांनी केले पाहिजे.धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी जनतेने या सभागृहात पाठविलेले आहे. याचा विचार झाला पाहिजे.कुणाला आनंद झाला असेल तर त्यांनी या सभागृहात व्यक्त न करता इतर बाहेर ठिकाणी करावा बेळगाव महानगरपालिका कर्नाटक सरकारने बरखास्त केली त्यामूळे तेथील महापौर उपमहापौर यांचा अपमान झालेला आहे. त्यामूळे त्या सरकारचा निषेध करणे योग्य आहे. .

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :१९ तारखेची सभा पूढे ढकलून आज २४ तारखेला कोणत्या कायदयानुसार आयोजित करता येते. याची माहिती देण्यात यावी.

.मा.महापौर :माझी वैयक्तिक तांत्रिक अडचण असल्यामूळे तीन दिवस अगोदरच सचिव यांना सभा आज आयोजित करण्यात बाबत पत्र दिलेले होते. त्यामूळे १९ तारखेची सभा आज आयोजित केलेली आहे.

श्री.मुजीब खान :शहराच्या विकास कामावर चर्चा करण्यात यावी. लाईट विभागात लाईट लावण्याची मागणी केली असता बजेट नाही म्हणून सांगितले जाते. शहरात अनेक ठिकाणी अंधार आहे. यासाठी बजेट मधे तरतूद करणार होते. कोणत्या हेडमधून तरतूद करणार आहे याचा खुलासा करावा.तसेच महानगरपालिकेच्या वतीने एमएसईबीला जेलाईट बील भरल्या जाते. त्या संदर्भातील अनेक ठिकाणी मिटर बंद असून लमसम बिल येते अशी माहिती आहे. अधिकारी तसेच सर्व शाळामधील

मिटर बंद असतांना असे बिल येणे कितपत योग्य आहे.यात महानगरपालिकेचे मोठे नुकसान होत आहे. याचा खुलासा अधिकारी यांनी करावा.

मा.महापौर :प्रशासनाकडून एक प्रस्ताव सादर झालेलाआहे. लाईटसाठी देखभाल दुरूस्तीसाठी हेड मधे बदल करून मंजूरी दयायची आहे. या विभागा संदर्भात कितीमीटर बंद आहे. किती चालू आहे. या बाबतीत संबधीत विभागाचे अधिकारी यांनी खुलासा करावा.

डॉ.भागवत कराड :या वर्षीचे बजेट मंजूर होवून तीन महिने झालेले असतील. अधिकारी सांगतात लाईटसाठी जे बजेट होते ते मागिल वर्षीच खर्च करण्यात आलेले आहे. तर या वर्षी लहान लहान लाईटची कामे करण्यासाठी बजेट नाही अनेक वार्डात अनेक दिवसापासून मोठमोठया रस्त्यावर लाईट बंद आहे. या वर्षभरात लाईटची कामे करण्यासाठी काय उपाययोजना करणार आहे संबधीत अधिकारी यांचेकडून खुलासा घेण्यात यावा.

श्री.कैलास गायकवाड :गारखेडा भुंखंड प्रकरणाच्या संदर्भात संबधीतांवर काय कार्यवाही करण्यात आलेली आहे. त्याचा खुलासा करावा.

मा.महापौर :मा.आयुक्त यांनी त्या संदर्भात पोलीस केस केलेली असून पोलीस चौकशी मध्ये जे निष्पन्न होईल त्यानुसार कार्यवाही होईल.

श्री.मुजीब खान :सभागृहात असा निर्णय झालेला होता की मा.महापौर मा.आयुक्त चौकशी करतील व जे अधिकारी दोषी आहेत त्यांचेवर ही पोलीस गुन्हा नोंदविण्यात येईल.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:ज्यांचेवर चार्जशिट झाले त्यांना कामावर घेतले जाते.दोषी जे आहेत त्यांना शेवटपर्यत दोषीच ठरवले पाहिजे. त्यांना कामावर घेतले जावू नये नसता चौकशी करून उपयोग नाही..

श्री.मुजीब खान :ज्या विभागाचे हे प्रकरण आहे त्याच विभागाचे अधिकारी यांनी पोलीसात गुन्हा नोंद केलेला आहे. तो त्यांनी न नोदविता उपआयुक्त किंवा इतर अधिकारी यांनी नोदवावा म्हणून आपण रूलींग दिलेले होते.

मा.महापौर :ज्या कर्मचाऱ्याना कामावर घेतले त्या संदर्भात या सभागृहात चर्चा झालेली होती. न्यायालयीन प्रकरणाचा जो निकाल लागेल त्या अधिन राहून कामावरन घेण्याबाबत निर्णय घेतलेला होता त्यानुसार त्यांना कामावर घेतलेले आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेराय:कोर्टाचा निकाल कर्मचारी सेवानिवृत्त होईपर्यत काही प्रकरणात लागत नाही.

मा.महापौर :दुसऱ्या विषयावर चर्चा करावी.

श्री.कोकाटे काशिनाथ :या संदर्भात सर्वसाधारण सभेचे निर्णय घेतल्यानंतर स्थायी समितीने सुध्दा त्यांना कामावर घेण्या बाबत निर्णय घेतलेला होता. मेरी या संस्थेमार्फत जे काही ४७५ अभियंते आहे त्यांचेवर कार्यवाही करण्यात आली आहे. वास्तविक पाहता सदर कर्मचारी किंवा महानगरपालिकेचा त्यात दोष आहे किंवा नाही हा भाग वेगळा आहे. जी मार्कस् वाढवून दिले गेले ते मेरी या संस्थेकडून झालेले आहे. तसा सुरूवातीस अहवाल या सभागृहात आलेला होता. या सभागृहात मा.महापौर यांनी चर्चा केल्यानंतर जे काही इतर शासनाच्या खात्यातील अभियंते आहे त्यांचेवर जी कार्यवाही झालेली आहे त्यांचा अहवाल बघून निर्णय घेतलेला आहे.

श्री.वसंत नरवडे :शहरात अनेक ठिकाणी लाईट बंद आहे माझ्या वार्डातही लाईट नाही. पोल बदलण्यासाठी व लाईट टाकण्यासाठी चार महिण्यापासून तक्रार करीत आहे तरीही काम होत नाही. विदयूत विभागातून टाळाटाळ केली जात आहे. बजेट नाही म्हणून सांगितले जाते. एक कोटी बजेट कोठे खर्च करण्यात आले याची माहिती घ्यावी. निष्कृष्ट दर्जाचे लाईटचे साहित्य घेतले जाते. दोन तीन दिवसात लाईट बंद

पडतात. त्याची चौकशी झाली पाहिजे. पूढील काळात लाईटसाठी तरतूद करणार की नाही याचाही खुलासा घेण्यात यावा.

डॉ. भागवत कराड :एक कोटी लाईटसाठी ठेवलेले होते ते खर्च झालेले आहे.असे अधिकारी सांगतात. बजेट शिल्लक नाही. यापूढे लाईटची कामे होणार की नाही याचाही खुलासा करण्यात यावा.

मा.महापौर :लाईटच्या संदर्भात आताच स.सदस्यांनी ज्या सुचना मांडल्या त्याचा सविस्तर खुलासा कार्यकारी अभियंता विदयूत यांनी करावा.

कार्य.अभियंता(विद्यु.) :ऑगस्ट महिण्यात मी या विभागाचा चार्ज घेतलेला होता. विदयुत विभागाचे संबधीत उपअभियंता यांचे समवेत बैठक घेतली त्यांनी असा अहवाल दिला की. मागिल आंचारसंहितेच्या काळात बरीब लाईटची कामे करण्यात आलेली आहे. वर्कऑर्डर देता आल्या नाही परंतु अनेक कामे केलेलीआहे. बजेट हे स्पील ओव्हरच्या कामावरच खर्च झालेले आहे. स्पिल ओव्हरची आणखी कामे राहिलेली आहे त्यासाठी बजेट शिल्लक नाही. जो देखभाल दुरूस्तीचा खर्च होता तो गेल्या वर्षीच्याच कामामधे खर्च झालेला आहे. दुसरा मुद्या मिटर च्या संदर्भात विचारलेला आहे. कोणते मिटर चालू आहे. कोणते नाही.कोणती बिले लमसम येतात कोणती बिले रिडींगप्रमाणे येतात याची माहिती घेण्यात येईल.तसा अहवाल देण्यात येईल.

श्री.वसंत नरवडे :आचारसंहितेच्या काळात माझ्या वार्डात लाईट बसवले कनेक्शन दिले नाही. लाईट लावण्यात आले नाही. परंतू बिले देण्यात आलेली आहे.

सौ.कला बोरामणीकर :माझ्या वार्डात लाईट फिटींग केले. कनेक्शन देण्यात आलेले नाही लाईट चालू नाही. तरी ही बिले देण्यात आलेली आहे.५० ते ६० लाईट बंद आसून तेही मोठया रस्त्यावरील लाईट बंद आहे.

डॉ.भागवत कराड :जूने हेडगेवार रूग्णालय इमारत पासून ते टेलीफोन ऑफिस पर्यत या रस्त्यावरील लाईट अनेक दिवसापासून बंद आहे. वारवांर अधिकारी यांना सुचना देवूनही कार्यवाही होत नाही. बजेट नसेल तर ते कोठे खर्च करण्यात आलेले आहे याची माहिती देण्यात यावी.

श्री.संजय केनेकर :निराला बाजार परीसरातील रस्त्यावरील जे अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे त्याबध्दल प्रशासनाचे अभिनंदन करतो व ज्या व्यापाऱ्यांनी अधिकाऱ्याना धमकी दिली त्याचेवर कार्यवाही केलेली आहे का अतिक्रमण काढण्याची मोहीम थांबलेली आहे ती न थांबविता पूढे अशीच चालू ठेवावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:काही अतिक्रमणे तशीच आहे. काढण्यात आलेली नाही त्या संबधीचे फोटो मी आणलेले आहे. (मा.महापौर यांना छायाप्रत दाखवितात.)

सौ.कला बोरामणीकर :अतिक्रमण काढतांना बाजूची जी अधिकृत इमारत असते त्यास धोका निर्माण होणार नाही अशा पध्दतीने कार्यवाही व्हावी. तसेच शंहागंज सिल्लेखाना परीसरातील मोठमोठे अतिक्रमण आहे. फक्त निराला बाजार परीसरातीलच अतिक्रमण काढण्याची कार्यवाही का होत आहे.

श्री.प्रशांत देसरडा :विषय पत्रिके शिवाय अशी चर्चा करता येत नाही.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : मागिल बैठकीत मी सुचना केलेली होती की विषय क्र. २ मध्ये मागिल बैठकीत झालेल्या चर्चेनुसार काय कार्यवाही केलेली आहे. ते नमूद असावे. परंतू तसे विषय पत्रिकेवर दिलेले नाही.चालू वर्षीच्या बजेटमधील कोणतीही कामे सूरू झालेली नाही. पूढील वर्षाचे बजेट दोन तीन महिण्यानी मंजूरीसाठी येईल तरी मागिल वर्षाचे बजेट मधील विकास कामे अद्याप झालेली नाही. तसेच दर महिण्यात सर्वसाधारण सभा ही २० तारखेच्या आतच झाली पाहिजे. अशी माझी सूचना आहे.

मा.महापौर :बैठक का उशीर आयोजीत केलेली आहे या बाबतीत यापूर्वीच खूलासा केलेला असून इतर आपल्यासुचनाची नोंद घेतलेली आहे.

सौ.मेहरून्नीसा बेगम :किराडपूरा शाळेच्या ओपनस्पेसवर अतिक्रमणाच्या संदर्भात माहिती मागविलेली होती. उत्तर देण्यात आलेले नाही. माहिती घेण्यात यावी.

श्री.सलीम पटेल :श्री.बनकर हे उपअभियंता म्हणून कसे काम करतात. या संदर्भात मी मा.आयुक्त यांना दोन महिण्यापूर्वी पत्र दिलेले आहे अदयाप माहिती देण्यात आलेली नाही. त्या बाबतीत खुलासा करावा.

श्री.दिलीप गायकवाड :औरंगपूरा नाल्यावर जे शिवानी ट्रस्ट काम चालू आहे दिलेल्या परवानगीनुसार काम चालू आहे का याचा खुलासा घेण्यातयावा.

श्री.संजय जोशी :गेल्या तीन दिवसापासून शहरात पाणी नाही. पाईप लाईन फुटलेली असून दुरूस्तीचे काम चालू आहे. परंतु प्रशासनाच्या हे निदर्शनास आणून देवू इच्छितो की. नवीन समांतर जलवाहिनी तात्काळ टाकली नाही तर भविष्यात शहरातील नागरीकांना पाण्यासाठी मोठा त्रास सहन करावा लागेल. पैठण धरणात पाणी असेल परंतू नागरीकांना पाणी देवू शकणार नाही अशी परीस्थिती निर्माण होवू शकते मा.आयुक्त यांनी या संदर्भात खुलासा करावा.

मा.आयुक्त :सध्या शहरातील नागरीकांसाठी १४० एमएलडी पाणी उचलले जाते. औरंगाबाद शहराची सन २०२० ते २०३० पर्यतची लोकसंखया किती वाढेल याचा विचार केल्यास समांतर जलवाहिनी करणे गरजेचे आहे. सन १९९७ मधे ६७ कोटीची योजना मंजूर झालेली होती त्यापासून ६५ एमएलडी पाणी पुरवठयात वाढ होणार होती. त्यात एमजीपीच्या तांत्रिक अडचण आलेली आहे. समांतर जलवाहिनी टाकण्या संदर्भात दोन प्रस्ताव प्रशासनाने केलेले असून पहिल्यांदा बीओटी पध्दतीने ही योजना करण्याचा विचार आहे. टेंडर वगैरे मागविलेले आहे १८ टेंडर गेलेले आहे. यात अशी अट आहे की २०३१ पर्यत होणाऱ्या लोकसंख्येला पाणी पूरेल अशी व्यवस्था करणार आहोत.या संदर्भात अंतिम निर्णय झाल्यानंतर पुन्हा सर्वसाधारण सभेकडे प्रस्ताव देण्यात येईल.जर बीओटी पध्दतीने कार्यवाही झाली नाही तर प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्स्लटंट नियुक्त करून कार्यवाही करण्यात येईल. यासाठी जवळ पास २०० ते २२५ कोटी खर्च अपेक्षीत आहे.बीओटी पध्दतीने कार्यवाही करण्याचे प्रशासनाचे पहिल्यांदा धोरण आहे. या संदर्भात पदाधिकारी स.सदस्य यांचे काही मार्गदर्शन मिळत असेल तर योग्य होईल.बीओटी पध्दतीने कार्यवाही केल्यास त्यामधे अटी शर्ती राहणार आहे. २०३१ पर्यतचा करार राहील.योग्य तो निर्णय घेवूनच कार्यवाही होणार आहे.

श्री.संजय जोशी :मी माहिती घेतली असता असे समजले की बीओटी पध्दतीने कार्यवाही केल्यास दरमहा संबधीतास ५ ते ५.५० कोटी रूपये अदा करावे लागणार आहे. प्रशासनाला जो निर्णय घ्यायचा तो घ्यावा. परंतू तात्काळ कार्यवाही न केल्यास येणाऱ्या काही दिवसानंतर पाणी प्रश्नास सामोरे जावे लागणार आहे.

श्री.मुजीब खान :एकच जलवाहिनीद्वारे शहराला पाणी पूरवठा होत असे. त्यानंतर दुसरी जलवाहिनी टाकण्यात आली. पंपहाऊस एक असून पाणी दोन लाईनद्वारे आणण्यात येते. आता पुन्हा जलवाहिनी टाकणार आहोत. आणखी एक नवीन पंपहाऊस नवीन करणार किंवा कसे की पूर्वीच्याच पंपहाऊसमधून याही जलवाहिनीद्वारे पाणी येणार आहे. याचाही खुलासा करावा.

मा.महापौर :आताच मा.आयुक्त यांनी खुलासा केलेला आहे.विषय पत्रिका घेण्यात येत आहे.

**विषय क्र. ९८/१ :**

दिनांक ३०/०८/२००५,दिनांक १६/०९/२००५ आणि दिनांक ०७.१०.२००५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

मा.महापौर : इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

दिनांक ३०/०८/२००५,दिनांक १६/०९/२००५ आणि दिनांक ०७.१०.२००५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र. ९९/२ :**

दि.१९.०१.२००५ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेतील विषय क्रमांक ५२५/२ नुसार श्री.के.के.फड, यांना महानगरपालिका कर मुल्य निर्धारक व संकलक या पदावर दि.०४.०२.२००४ पासून एक वर्षाच्या प्रतिनियूक्तीच्या कालावधीसाठी ठराव मंजूर झालेला आहे. प्रतिनियूक्तीचा कालावधी दि.०३.०२.२००५ ला संपलेला आहे.

कर मुल्य निर्धारक व संकलक यांच्या नियंत्रणाखाली महापालिका हद्दीतील नविन मालमत्ता शोध मोहीम सध्या राबविण्यांत आलेली आहे, सदरील मोहीम अद्यापही पूर्ण झालेली नाही. तसेच निवडणूक आयोगाने औरंगाबाद जिल्ह्यांसाठी नविन मतदार संघ घोषित केल्यामूळे व मा.आयुक्त, जनगणना, यांनी कळविलेल्या पत्रानुसार जनगणनेसाठी महापालिका हद्दीतील वॉर्डाची हद्द निश्चित करण्यासाठी अनुभवी अधिकाऱ्याची आवश्यकता असल्याने संबंधितास कामाचा अनुभव असल्याने त्यांना मुदतवाढ देणे आवश्यक वाटते.

करिता, श्री.के.के.फड, यांना महानगरपालिका कर मुल्य निर्धारक व संकलक या पदावर दि.०४.०२.२००५ पासून एक वर्षासाठी प्रतिनियूक्तीचा कालावधी प्रतिनियूक्तीच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून वाढून देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:हा प्रस्ताव मंजूर करू नये श्री. फड यांचे रेकॉर्ड बरोबर नाही त्यांचेवर आरोप लागलेले आहे. माझा विरोध आहे.

मा.महापौर :स.सदस्य श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय यांचा या प्रस्तावास विरोध नोंदवून प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.के.के.फड, यांना महानगरपालिका कर मुल्य निर्धारक व संकलक या पदावर दि.०४.०२.२००५ पासून एक वर्षासाठी प्रतिनियूक्तीचा कालावधी प्रतिनियूक्तीच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून वाढून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १००/३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे आदेश शासन निर्णयक्र.नियूक्ती२००५/७६२/प्र.क्र.२४४(२)/सेवा-२,मंत्रालय,मुंबई-३२ नुसार डॉ.पी.आर.कुलकर्णी, उपसंचालक,आरोग्य सेवा (साथरोग),पुणे यांची 'वैद्यकीय आरोग्य अधिकारी' औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद या पदावर लोकहित व प्रशासकीय कारणास्तव प्रतिनियूक्तीच्या विहीत अटी व शर्तीनुसार नेमणूक करण्यांत आली आहे.

करीता डॉ.पी.आर.कुलकर्णी, यांची रूजू झाल्याच्या तारखेपासून म्हणजे दि.१२.०९.२००५ रोजी मध्यान्हापूर्व ''वैद्यकीय आरोग्य अधिकारी'' औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद या पदावर प्रथमत: एक वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियूक्तीच्या अटी व शर्तीनुसार प्रतिनियूक्तीस मान्यता देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

मा.महापौर :प्रस्ताव सर्वानूमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, डॉ.पी.आर.कुलकर्णी, उपसंचालक,आरोग्य सेवा (साथरोग),पुणे यांची वैद्यकीय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद या पदावर प्रथमत: एक वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियूक्तीच्या अटी व शर्तीनुसार प्रतिनियूक्तीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

श्री.मो.जावेद मो.इसहाक : तीन महिण्यापूर्वी मी एक पत्र दिलेले होते. त्यांचा खुलासा मिळालेला नाही.

मा.महापौर : विषयपत्रिकेवर चर्चा करावी इतर विषयावर चर्चा करण्यात येवू नये.चर्चेसाठी वेळ दिलेला होता.यानंतर कुणाला चर्चा करायची असेल तर विषयपत्रिका संपल्यानंतर चर्चा करावी.

श्री.मो.जावेद मो.इसहाक : मला चर्चा करू दयावी त्यानंतर विषय पत्रिकेला सुरूवात करावी.

याच वेळी स.स.श्री.मो. जावेद मो. इसहाक हे मा.महापौर डायस समोर जावून मोठमोठयाने बोलतात. काहीही ऐकू येत नाही.

मा.महापौर :स.सदस्य श्री. मो.जावेद मो. इसहाक यांना पहिली सुचना करण्यात येते की त्यांनी आपल्या जागेवर बसावे तेथून आपले मत मांडावे. नसता सभासदत्व रद्य करण्यात येईल.

श्री. मो.जावेद मो.इसहाक यांना जागेवर बसण्याची सुचना देवूनही ते जागेवर बसत नाही व हातातील विषयपत्रिका फाडून खाली टाकून सभागृहा बाहेर निघून जातात.

श्री.संजय सिरसाट :गेल्या ८ दिवसापासून निराला बाजार येथील अतिक्रमण चर्चेत आहे. तेथील कार्यवाही चालू असतांना एक नगरसेवकही गेलेले नाही. परंतू काल सहा. संचालक नगररचना श्री. राठोड साहेब यांना स.सदस्य श्री. मो. जावेद मो. इसहाक यांनी अनधिकृत प्लॉटवर परवानगी दयावी म्हणून मागणी केली व न दिल्यास तूम्हाला बघून घेवू असा दम दिला. संबधीत अधिकारी यांना शिवीगाळ केली. त्यामूळे संबधीत अधिकारी यांनी पोलीस स्टेशनमधे गुन्हा नोंदविला आहे. अधिकाऱ्यावर किंवा मा. महापौर यांचेवर अशा प्रकारची दादागिरीची भाषा कूणी बोलत असेल तर ते अत्यंत चूकीचे आहे. अशा सभासदांचे सभासदत्व रद्य करून ते कायमचे रद्य करण्या बाबत शासनाकडे शिफारस करावी.

मा.महापौर :सर्वानीआपआपल्या जागेवर बसावे. जागेवर उभै राहून आपले मत मांडावे.

श्री.संजय सिरसाट :गेल्या आठ दिवसापासून अतिक्रमण हटविण्याची पाडण्याची मोहीम सूरू आहे. मा. आयुक्त जेंव्हा येथे रूजू झाले तेंव्हाच मी त्यांना या शहरातील प्रथमत: अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही करावी म्हणून स्टेटमेंट केलेले होते.सध्या अतिक्रमण काढण्याची कार्यवाही होत आहे. ही कार्यवाही होत असतांना ती कुठे होते कुणाच्या वार्डात होते हा भेदभाव नसतो. परवाच्या दिवशी निराला बाजार परीसरात अतिक्रमण काढण्यासाठी यंत्रना गेली काढण्याची कार्यवाही होत होती कुणीही पदाधिकारी मधे बोललो नाही कारण अतिक्रमण करण्यास किंवा अतिक्रमण काढण्यास जो कोणी नगरसेवक अधिकारी पाठींबा देत असेल त्यांचेवर फौजइदारी स्वरूपाचा गून्हा दाखल झाला पाहिजे अशी नियमावलीत आहे शासनाचा जी. आर. सूध्दा आहे काल स.सदस्य श्री. मो. जावेद मो. इसहाक यांनी अनधिकृत प्लॉटवर परवानगी दयावी म्हणून मागणी केली व कार्यवाही होत नाही म्हणून जे.ई. श्री चांमले व सहा.संचालक श्री. राठोड साहेब यांना शिवीगाळ केली कूणी सदस्य सभागृहात दादागिरी करीत असेल व अधिकाऱ्यांना शिवीगाळ करीत असेल ही बाब सहन केली जाणार नाही काल झालेल्या घटनेची माहिती मा.आयुक्ताकडून घ्यावी. कुणी अधिकारी स.सदस्य सभागृहात गैरवर्तन करीत

| | |
|---|---|
| | असेल तर त्याचे सभासदत्व रद्य करावे व तसा प्रस्ताव शासनाकडे पाठवून कायमचे सभासदत्व रद्य करण्याची शिफारस करण्यात यावी. |
| श्री.अ.रशीद खान | : सभागृहात स.सदस्य चर्चा करीत असतांना मोठयाने बोलतात ही नवीन बाब नाही. आपल्या भावना दुखावल्या जातील असे वर्तन कुणीही करू नये यासी मीही सहमत आहे. कायमचे सभासदत्व रद्य करण्याचा अधिकार आपल्याला नाही. शासनास आहे. स.सदस्य श्री.मो. जावेद मो. इसहाक हे सभागृहाच्या बाहेर गेलेले आहे. त्यांचे सभासदत्व रद्यकरू नये. |
| श्री.संजय सिरसाट | : शिवीगाळ करणे आरेतूरेची भाषा बोलणे ही पध्दत बंद झाली पाहिजे. स.सदस्य श्री. मो. जावेद मो. इसहाक यांनी अधिकारी यांना शिवीगाळ केलेली आहे. व सभागृहातही ते मोठमोठयाने बोलत विषयपत्रिका फाडून सभागृहाच्या बाहेर गेलेले असून सभागृहाचा अवमान केलेला आहे. त्यांचे सभासदत्व रद्य करण्यात यावे . |
| श्री.अ.रशिदखान | :यापूर्वीही काहीही नगरसेवकांकडून चूक झालेली आहे. त्यांना आपण माफ केलेले आहे. |
| श्री.संवत नरवडे | :स.सदस्य जेंव्हा पत्र देतात त्यानुसार त्यांची कामे होत नाहीत म्हणून राग व्यक्त करत असतांना त्यांचेकडून काही  चुका झाल्या असतील परंतु त्या संदर्भात अधिकारी यांना सुध्दा जबाबदार धरले पाहिजे दिलेल्या पत्रानुसार का काम झाले नाही त्यांना आपण विचारू शकता चौकशी करण्याचे अधिकार आयुक्त यांना आहे. स.सदस्य आपल्याकडे आले होते. त्यांना आपण निलंबीत करण्याची भाषा बोलता हे चूकीचे आहे. अधिकारी सुध्दा यात काही प्रमाणात दोषी असू शकतात. |
| श्री.संजय सिरसाट | :कालच्या घटनेचा मा.आयुक्त यांनी खुलासा करावा अशी त्यांना विनंती आहे. |
| मा.महापौर | :मा.आयुक्त यांनी खुलासा करावा. |
| मा.आयुक्त | : शहरातील अतिक्रमण हटविण्याची मोहीम सुरू केली त्यात कोणताही पक्षपात नाही.१०० टक्के जे अतिक्रमण आहे ते काढणारच आहे. ही कार्यवाही करण्यासाठी कोणत्या तरी भागातून सुरूवात करावीच लागेल. व त्या भागातील कुणाचेतरी नुकसान होणारच आहे. प्रशासनाने इनंटरनल प्लॅनींग केलेले आहे. अतिक्रमण मोहिम संपल्यानंतर जेथे अतिक्रमण राहिले असेल ते आपण दाखवून देवू शकता तेही काढण्यात येईल. या मोहिमेस आतापर्यत जनरली सर्वाचे सहकार्य मिळाले फक्त तीन स.सदस्यांनी विरोध केला आहे . तरी प्रशासनातर्फे नम्रपणे सांगू इच्छितो की शासनाने कायद्यात दुरूस्ती करून कोणतेही अतिक्रमण पाडतांना तोंडतांना नगरसेवक मध्ये आले तर त्यांचे सभासदत्व रद्य होवू शकते मला खात्री आहे की ही तरतूद वापरण्याची प्रशासनास गरज भासणार नाही. निरालाबाजार येथील मोहीम थांबलेली नाही काल जो प्रकार झाला त्यानुसार एक स.सदस्य यांनी सहा. संचालक नगररचना अधिकारी यांना एक प्लॉटच्या संदर्भात शिवीगाळ केलीत्यानुसार कायदयाप्रमाणे त्याचेवर गुन्हा दाखल केलेला आहे असा प्रकार घडल्यावर प्रशासनास दुसरा पर्याय नसतो. अतिक्रमण काढण्यासाठी आपणा सर्वाचे सहकार्य लागेल ते आपण करावे. या संबधीची सविस्तर माहिती संबधीत अधिकारी देतील.मी फक्त संबधीत अधिकारी यांना पोलीसात तक्रार करण्याची परवानगी दिलेली होती. |
| मा.महापौर | : सहा.संचालक नगररचना यांनी या संदर्भात सविस्तर खुलासा करावा. |
| सहा.संचालक(न.र.) | : स.नगरसेवक श्री.मोहम्मद जावेद मो.इसाक हे आज रोजी सायं.०५=०० वा.चे सुमारास माझ्या कार्यालयात आले आणि श्री.शेख मुश्ताक शे.महेमुद यांच्या मालकीच्या न.भू.क्र.११४३१/१ (क्षेत्र १५७१.६० चौ.मी.) पैकीच्या २०६.८० |

चौ.मी. क्षेत्राच्या अनाधिकृत खूल्या भूखंडाचे गुंठेवारीमध्ये नियमानुकूल करण्याबाबत संचिका दाखल करून घेवून सदर भूखंड गुंठेवारी अंतर्गत नियमीत करणेसाठी विचारणा करणेसाठी कार्यालयात आले असता आता Total Station Survey Machine ने सर्व गुंठेवारी भागाचे सर्वेक्षण करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाल्यानंतर त्याबाबत योग्य तो विचार करण्यात येईल असे त्यांना मी स्वत: म्हणालो. सदरील प्रकरण पूर्वी त्यांनी बांधकाम परवानगी संचिका क्र.२४३/१७/२००५-०६ दि.३.८.२००५ नुसार प्रकरण बांधकाम परवानगीसाठी दाखल केले असता वरील १५७१.६० चौ.मी. या संपूर्ण क्षेत्रासाठी जमीन विकास शुल्क (LDC) (रक्कम रू.३१,४४०/-) तसेच विकास खर्च जमा केले आहे किंवा कसे याबाबत पडताळणी होण्याच्या अधिन मान्य करण्यात आले होते. तथापी, सदरील रक्कम भरण्याची त्यांची इच्छा नसल्यामूळे सदरील २०६.८० चौ.मी. क्षेत्राची गुंठेवारीमध्ये नियमानुकूल करण्यासाठी दबाव टाकण्यासाठी ते कार्यालयात आले. सदरील बांधकाम परवानगी प्रकरण कनिष्ट अभियंता या नात्याने श्री.संजय लक्ष्मणराव चामले यांनी हाताळलेले आहे. श्री.चामले हे मुख्य इमारतीमध्ये होते.त्यांना त्यांनी मोबाईल क्र.९४२३१४९७३५ वर माझ्या टेबलवरील विस्तार क्र.३२२ वरून फोन करून बोलावून घेतले. यावेळी कार्यालयात आर्किटेक्ट श्री.जाजु,श्री.रविंद्र बलदवा,श्री.सिताराम गायकवाड ई. हजर होते. वरील सर्वांसमक्ष श्री.मो.जावेद मो.इसाक (जावेद कुरैशी) यांनी आम्हाला मोठमोठ्याने ओरडून अर्वाच्च भाषेत शिवीगाळ केली तसेच शासकीय कामात अडथळा केला.तरी सदरील प्रकरणी त्यांचे विरूध्द गुन्हा दाखल करण्यात यावा.

श्री.अ.रशिद खान : श्री.जावेद कुरैशी यांनी लेखी दिलेले आहे का ?

सहा.संचालक (न.र.) : लेखी दिलेले नाही.

श्री. वसंत नरवडे :गुंठेवारी त घेण्यासाठी पैसे भरण्यास तयार होते का ?ती जागा गुंठेवारीमधे येत नाही का असा माझा प्रश्न आहे संबधीत व्यक्ती ची पैसे भरण्याची इच्छा नाही असे अधिकारी स्वत:च का म्हणतात.जेंव्हा संचिका दाखल आहे. तर गुन्हा नोंद करण्याची गरज काय?

श्री.संजय सिरसाट :सहा.संचालक नगररचना अधिकारी यांना स.सदस्य श्री. मो. जावेद मो. इसहाक यांनी शिवीगाळ केली आताच त्यांनी माहिती वाचूनदाखवली त्यात आलेले आहे.

मा.महापौर यापूढे कोणत्याही सदस्यांनी अधिकारी यांचेशी गैरवर्तणूक किंवा अपशब्द बोलू नये अशी सूचना देण्यात येत आहे.

**विषय क्र. १०१/४ :**

दिनांक १५.१०.२००५ च्या (दि.०९ ऑगस्ट २००५ ची तहकूब सभा) शहर सुधार समितीने ठराव क्र.३ अन्वये, औरंगाबाद शहर मंजूर विकास योजना वाढीव हद्द मौजे कांचनवाडी येथील आरक्षण क्र.१० व मौजे ईटखेडा येथील आरक्षण क्र.११ अनुक्रमे प्राथमिक शाळा व क्रिडांगण या आरक्षणासंबंधी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये दिलेली खरेदी सूचना जमिन मालकाने परत घेतली असली तरी आरक्षण क्र.१० व ११ अन्वये खरेदी सूचना देणार यांचे बाधीत होणारे क्षेत्रासह वरिल दोन्ही संपूर्ण आरक्षणाखालील क्षेत्र संपादीत करण्यास आणि भूसंपादनासाठी येणाऱ्या खर्चास मंजुरी देवून सर्वसाधारण सभेस शिफारस केली आहे.

**शहर सुधार समितीच्या मंजुरीसाठी प्रशासनातर्फे दाखल केलेला मूळ प्रस्ताव खालीलप्रमाणे.**

सहाय्यक संचालक नगर रचना,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे, औरंगाबाद शहर मंजुर विकास योजना वाढीव हद्द नुसार मौजे कांचनवाडी येथील गट क्रमांक १२/पै व मौजे

इटखेडा येथील गट क्रमांक ३३/ पैकी मध्ये आरक्षण क्रमांक १० प्राथमिक शाळा बाधित क्षेत्र विकास योजना अहवालानुसार ५२ आर व आरक्षण क्रमांक ११ क्रिडांगण बाधित क्षेत्र योजना अहवाला नुसार अंदाजे ५२ आर असून मौजे कांचनवाडी येथील गट क्रमांक १२/पैकी मिळकतधारक, सारा बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे श्री.एस.आर.अग्रवाल यांची साडेसहा एकर जमिन असून त्यापैकी दीड एकर जमिन उक्त आरक्षणाने बाधित असल्याने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम-१२७ अन्वये खरेदी सूचना दिनांक २८/०६/२००५ रोजी औरंगाबाद महानगरपालिकेस बजावलेली आहे. उक्त मंजूर विकास योजना मंजूर होवून दहा वर्षाचा कालावधी लोटलेला असल्याने अर्जदाराची खरेदी सूचना लागू होते.

उपरोक्त खरेदी सूचनेच्या अनुषंगाने भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचेकडे खरेदी सूचना दिल्याच्या तारखेपासून सहा महिन्याच्या आत म्हणजे दिनांक २७/१२/२००५ पूर्वी पाठविणे आवश्यक आहे नसता अर्जदाराची जमिन आरक्षणातून व्यपगत होते.

मंजूर विकास योजना अहवालानुसार उक्त आरक्षणा खालील वरील दोन गटा मधील जमिन संपादन होत असून अंदाजे क्षेत्र वरीलप्रमाणे प्रत्येकी ५२ आर दर्शविले आहे व दोन्ही आरक्षणाचे अंदाजे भूसंपादन खर्च ९८.६४ लक्ष दर्शविलेला आहे. सबब अर्जदाराने दिलेल्या खरेदी सूचनेप्रमाणे म्हणजेच त्यांचे बाधित क्षेत्रासह उर्वरीत क्षेत्र सुध्दा संपादन केल्यास आरक्षणाचा संपूर्ण उद्देश सफल होईल.

करीता वरील प्रमाणे जमिन संपादन करणेस व त्यासाठी लागणाऱ्या भूसंपादन खर्चाच्या मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.तरविंदरसिंग धिल्लन : या सदंर्भात १२७ नोटीस जमीन मालकाने महानगरपालिकेत दिलेली होती. सदर नोटीस मागे घेतली.या जमिनीची किमंत ही २० लक्षपेक्षा जास्त नसून यात ९८ लक्ष दर्शविलेली आहे.ती जास्त होते. एवढी रक्कम देण्यास महानगरपालिकेकडे तरतूद आहे. का? या संदर्भात विधी सल्लागार यांचा खुलासा घेणे योग्य होईल. प्रस्ताव मंजूर करू नये.

श्री. प्रशांत देसरडा :प्रस्ताव रद्य करावा.

मा.महापौर : सबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

श्री.मुजीब खान :या जागेची किमत कशाचे अधारे काढलेली आहे. त्या जागेची किमंत एवढी नाही.

सहा.संचालक (न.र) :या जागेची किमंत चालू रेडी रेकनर नुसार काढलेली आहे. सदर खरेदी सूचना संबधीत जमीन मालकाने दिनांक १५.१०.२००५ रोजी परत घेतलेली आहे. ही जागा घेणेस आता बंधनकारक नाही.

श्री.नारायण कुचे :प्रस्ताव नामंजूर करावा आर्थिक परीस्थिती बरोबर नाही.

सौ.अनिता घोडेले :सदरील प्रस्तावामधे कांचनवाडी येथील गट क्र. १२ पैकी व इटखेडा येथील गट क्र ३३ पैकी आरक्षण क्र ११ क्रिडांगणासाठी आरक्षीत आहे. सदरील आरक्षीत जमीन भुसंपादन करण्यासाठी मिळकत धारक श्री. अग्रवाल एस.आर. यांनी १२७ ची खरेदी सुचना दिल्यानंतर भुसंपादनाच्या खर्चाच्या मान्यतेसाठी हा प्रस्ताव आलेला आहे. संबधीत मिळकत धारकाने खरेदी सुचना परत घेण्याचे कारण काय? याचा सविस्तर खुलासा प्रशासनाने करावा.

मा.महापौर :संबधीत अधिकारी यांनी आताच खुलासा केलेला आहे. प्रस्ताव रद्य करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव रद्द करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

## गलिच्छ वस्ती निर्मूलन,घर बांधणी व समाज कल्याण समिती सभेकडील प्रस्ताव

**विषय क्र. १०२/५ :**

दिनांक २८.१०.२००५ च्या गलिच्छ वस्ती निर्मूलन,घर बांधणी व समाजकल्याण समितीने ठराव क्र.३ अन्वये, महापालिकेच्या दारिद्रय निर्मूलन कक्षातर्फे प्राधान्याने झोपडपट्ट्यामध्ये कार्यरत असलेल्या

केंद्रामधील महिलाकडून शासनाच्या तांत्रिक बोर्डाचे सूचनेनुसार प्रति प्रशिक्षणार्थी नोंदणी शुल्क रू.११०/- परिक्षा शुल्क रू.२४०/- असे एकूण रू.३५०/- याप्रमाणे प्रत्येक वर्षी माहे ऑगस्ट मध्ये कमकुवत घटक कल्याण या लेखाशिर्षकातून शासनास अदा करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. यामुळे कमकुवत घटक कल्याण निधीतून दरवर्षी रू.२१०००/- खर्च करण्यांस मंजूरी देण्यात येते. याशिवाय प्रशिक्षणार्थींना प्रतिमहा रू.१०००/- विद्यावेतन देणे,प्रत्येक प्रभागातून एक याप्रमाणे जादा ४३ जादा प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देणे, आणि जादा ४३ प्रशिक्षणार्थी करीता दोन शिवणकला शिक्षकाचे पद निर्माण करण्यास मंजुरी देवून सर्वसाधारण सभेस शिफारस केली आहे.

**गलिच्छ वस्ती निर्मूलन,घर बांधणी व समाजकल्याण समितीच्या मंजुरीसाठी प्रशासनातर्फे दाखल केलेला मूळ प्रस्ताव खालीलप्रमाणे.**

मा.आयुक्तांच्या मान्यतेनुसार प्रकल्प संचालक यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मनपाच्या दारिद्रय निर्मूलन कक्षातर्फे १९९० पासून १ वर्ष कालावधीचे शासन मान्यता प्राप्त आय.टी.आय. दर्जाचे प्रशिक्षण देण्यांत येते, प्रशिक्षण घेतलेल्या बऱ्याच महिला प्रथम श्रेणीत/द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण होत असतात. सदर प्रशिक्षण केंद्र प्राधान्याने झोपडपट्टयांमध्ये एक वर्षासाठी कार्यरत असतात. एका केंद्रामध्ये २० महिलांना प्रशिक्षणासाठी प्रवेश दिला जातो. सद्यस्थितीत प्रशिक्षण घेतलेल्या ६०% महिला स्वयंरोजगार करीत आहेत.

शासनाच्या तांत्रिक बोर्डाच्या सूचनेनुसार २००४ पासून नोंदणी शुल्क रू.११०/-तसेच परिक्षा शुल्क रू.२४०/- असे एकूण रू.३५०/- प्रत्येक वर्षी ऑगस्ट मध्ये शासनाकडे जमा करणे बंधनकारक असते. तसेच महानगरपालिकेचे प्रवेश शुल्क रू.५/- व मासिक शुल्क रू.५/- असे वार्षिक शुल्क रूपये ६५/- प्रशिक्षणार्थिंना जमा करावे लागते.

मा.आयुक्तांच्या मान्यतेनुसार प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिकेच्या ''कमकुवत घटक कल्याण'' या लेखाशिर्षा अंतर्गत साधारणत: रू.५० लक्ष तरतुद करण्यांत येते. या निधीतून मागासवर्गीय महिलांचे शासनाला प्रत्येक वर्षी, प्रति प्रशिक्षणार्थी प्रदान करावयाचे शुल्क रू.३५०/- अदा करण्यात यावे यामुळे दरवर्षी या निधीतून २१०००/- खर्च करण्यात येईल. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.संजय जोशी :या प्रस्तावात शेवटच्या परीच्छेद मधे दिलेले आहे की मा.आयुक्तांच्या मान्यतेनूसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की. महानगरपालिकेच्या कमकुवत घटक कल्याण या लेखा शिर्षकाअंतर्गत साधारणत: ५० लक्ष तरतूद करण्यात येते. मूळ बजेटमधे ही तरतूद नव्हती का. याचा खुलासा करावा.

श्री.वसंत नरवडे :बजेटमधे तरतूद असतांना हा ठराव कशासाठी आलेला आहे. बजेटमधे तरतूद आहे का याचा खुलासा करावा.

प्रकल्प संचालक :कमकूवत घटक कल्याण निधी यासाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकामधे तरतूद करण्यात आलेली आहे.पाच टक्के कमकूवत घटक कल्याण निधी म्हणून तरतूद केली जाते. या तरतूदीतून ज्या मागासवर्गीय वसाहती आहेत. यांचे कल्याणासाठी खर्च होणार आहे. तसे शासनाचे आदेश आहेत.

सौ.लता दलाल :५० लक्ष रूपये कोणत्या हेड मधे ठरतूद आहे. प्रकल्प विभाग कि महिला बाल कल्याण निधीतून खर्च होणार आहे. तसेच महानगरपालिकेमार्फत ही योजना राबविणार की महाराष्ट शासन किंवा केद्र.शासना अंतर्गत राबविणार आहात.या योजनेसाठी शासनाचे अनुदान येणार आहे का व कमकूवत घटक असे दिले आहे त्यात कोणत्या वसाहती येतात.याचाही खुलासा करण्यात यावा.

श्री.संजय जोशी :बजेट बुक मधे किती नंबरच्या पानावर तरतूद केलेली आहे याचा खुलासा करावा.

| | |
|---|---|
| सौ.लता दलाल | :माझ्या माहिती प्रमाणे ५ टक्के खर्च हा महसूल मधून विकासासाठी केला जातो. विकासासाठी जो खर्च आहे त्यातून हा खर्च दाखविता येतो का याचाही खुलासा करावा. |
| श्री.संजय जोशी | :माझ्या माहिती प्रमाणे बजेटमधे ही तरतूद नाही. तर हा प्रस्ताव कसा मंजूरीसाठी सादर केला आहे.प्रशासनाने सभागृहाची माफी मागवावी. |
| सौ.लता दलाल | :सभागृहाचा वेळ वाया जात आहे. तरतूद कोठे आहे हे प्रशासनातील अधिकारी यांना माहिती नाही. प्रस्ताव कसा ठेवला. संबधीत अधिकारी यांना ताकीत दयावी असे प्रस्ताव पुन्हा येणार नाही याची दक्षता घ्यावी. |
| श्री.वसंत नरवडे | :प्रस्ताव रद्य करावा पूढील वर्षाच्या बजेटमधे तरतूद करावी.बजेटमधे यासाठी तरतूद नाही. |
| प्रकल्प संचालक | :बजेट बुकमधे ५० लक्ष ऐवजी १६ लक्ष नमूद केलेले आहे अधिकाऱ्याच्या चूकीमूळे आला आहे.पान क्र ९८ वर नमूद केलेले आहे.खर्च हा २१ हजारच अपेक्षीत आहे असे नमूद आहे. |
| श्री.संजय सिरसाट | :बजेटबूक मधे तरतूद नाही. प्रस्ताव मंजूरीसाठी येतात. तरतूद कूठे आहे हे प्रशासनास दाखविता आले नाही. अधिकाऱ्याच्या चूकीमूळे मा.आयुक्ताना खाली पाहावे लागते. अशी चुक पुन्हा अधिकाऱ्यांनी करू नये. ताकीद दयावी. |
| मा.आयुक्त | :मान्यता ही २१ हजार रक्कमेलाच घेत आहोत.५० लक्ष ऐवजी १६ लक्ष बजेट मध्ये नमूद केलेले आहे. |
| सौ.लता दलाल | :या प्रस्तावात चूक झालेली आहे. दूरूस्तीसह पूढील बैठकीत सादर करण्यात यावा. |
| मा.महापौर | :दुरूस्ती सह पूढील बैठकीत प्रशासनाने हा प्रस्ताव ठेवावा. |

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव दुरूस्तीसह पुढील बैठकीत ठेवण्यांस सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र. १०३/६ :**

दिनांक २८.१०.२००५ च्या गलिच्छ वस्ती निर्मूलन,घर बांधणी व समाजकल्याण समितीने ठराव क्र.४ अन्वये, मा.आयुक्त तथा संचालक नगर परिषद संचालनालय,मुंबई यांचेकडील दिनांक ३ सप्टेबंर २००५ च्या परिपत्रकानुसार सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना अंतर्गत सन २००५-२००६ या वर्षासाठी ८२१ प्रशिक्षणार्थींना प्रस्तावातील अ.क्र.१ ते २० नोंदणीकृत प्रशिक्षण संस्थामध्ये तक्त्यातील प्रशिक्षणार्थी संख्या व तीन महिन्याचे प्रशिक्षण देण्यास आणि मुलभूत सुविधा या शिर्षकातंर्गत रू.८,२१,०००/- इतका खर्च करण्यास मंजूरी देण्यात येते. याशिवाय अ.क्र.१ ते २० नोंदणीकृत प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण केंद्रावर ये/जा करण्यासाठी कमकुवत घटक कल्याण निधी व महापालिका फंडातून प्रतिमहा रू.५००/- याप्रमाणे विद्यावेतन म्हणून अदा करण्यास मंजुरी देवून सर्वसाधारण सभेस शिफारस केली आहे.

**गलिच्छ वस्ती निर्मूलन,घर बांधणी व समाजकल्याण समितीच्या मंजुरीसाठी प्रशासनातर्फे दाखल केलेला मूळ प्रस्ताव खालीलप्रमाणे.**

प्रकल्प संचालक,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मा.आयुक्त तथा संचालक नगरपरिषद प्रशासन,संचालनालय मुंबई यांचे पत्र दिनांक ३ सप्टेंबर २००५ चे परिपत्रकानुसार २००५-२००६ या आर्थिक वर्षासाठी घटकनिहाय उद्दिष्टामध्ये जे शिल्लक निधी आहे या निधीमधून खालील प्रमाणे खर्च करणे बाबत कळविण्यात आले आहे.

मुलभूत सुविधा या शिर्षाअंतर्गत २७ लक्ष १७ हजार शिल्लक असून या निधीमधून रू.६ लक्ष ३० हजार फ़क्त प्रशिक्षण या योजनेत वर्ग करण्याबाबत कळविण्यात आले आहे. प्रशिक्षण योजनेत मागील वर्षाचे

रू.८ लक्ष ४२ हजार शिल्लक आहे. त्यातून वर्ग करावयाची एकूण रू.६ लक्ष ३० हजार असे मिळून एकूण रू.१४ लक्ष ७२ हजार प्रशिक्षण या योजनेत उपलब्ध आहेत.

२००५-२००६ या वर्षासाठी ८२१ प्रशिक्षणार्थीचे उद्दिष्ट आहे. तीन महिन्याचे कोर्स साठी प्रति प्रशिक्षणार्थीवर रू. एक हजार प्रमाणे ८२१ प्रशिक्षणार्थीवर रू.८ लक्ष २१ हजार (आठ लक्ष एकेविस हजार फ़क्त) खर्च होणार आहे. निवासी वस्ती सेविका परिसर विकास समिती कडून अर्ज मागविले आहेत.

महानगरपालिका मुख्य कार्यालय व दारिद्रय निर्मूल कक्षाच्या नोटीस बोर्डावर जाहिर सूचना लावण्यात आली होती त्यानुसार प्रशिक्षण देणाऱ्या नोंदणीकृत संस्थांनी या कार्यालयात अर्ज केले.. प्राप्त अर्जातील खालील संस्थांना प्रशिक्षणार्थी पाठविण्याचा प्रस्ताव मा.आयुक्तांकडे सादर करण्यात आला आहे. अद्याप संचिका अप्राप्त आहे.

| अ.क्र. | संस्था | संख्या | कोर्स |
|---|---|---|---|
| १ | सेतु | २० | शिवणकाम |
| २ | कोहीनूर टेक्नीकल इन्स्टिट्यूट | २५<br>२५<br>२५ | इलेक्ट्रीशियन<br>स्क्रीन प्रिंटींग<br>फ़ॅशन डिझायनिंग |
| ३ | शांती टेक्नीकल | ३०<br>२५ | मोबाईल दुरूस्ती<br>शिवणकाम |
| ४ | राजर्षी शाहु इन्स्टिट्यूट | २५ | मोबाईल दुरूस्ती |
| ५ | राही महिला मंडळ | ३०<br>२५ | शिवण काम<br>ब्युटीशियन |
| ६ | जनशिक्षण संस्थान | २५<br>२५<br>५०<br>५० | इंटेरिअर डेकोरेशन<br>कॅटरिंग टेक्नॉलॉजी<br>ब्युटीशियन<br>हार्ड वेअर |
| ७ | कल्पवृक्ष सामाजिक बहुउद्देशिय संस्था | २५ | शिवणकाम |
| ८ | प्रियदर्शनी महिला विकास संस्था | २०<br>१६ | शिवणकाम<br>ब्युटीशियन |
| ९ | अंजली बहुउद्देशिय सामाजिक संस्था | २० | ब्युटिशियन |
| १० | शहाजीराव भोसले शिक्षण प्रसारक मंडळ | २५<br>२५ | शिवणकाम<br>मोबाईल दुरूस्ती |
| ११ | ऋषीकेश महिला विकास बहुउद्देशिय संस्था | २५ | शिवणकाम |
| १२ | दत्तप्रभु शिक्षण प्रसारक मंडळ | २५ | स्क्रीनप्रिटींग |
| १३ | एच.एस.एच.शिक्षण सोशल वेलफ़ेअर सोसायटी | २५<br>२५ | शिवणकाम<br>स्क्रीनप्रिंटींग |
| १४ | नवचैतन्य बहुउद्देशिय सेवाभावी संस्था | ४० | शिवणकाम |
| १५ | विजयकला उद्योग संस्था | ४० | ज्युट हस्तकला |
| १६ | आदर्श महिला शिक्षण सोसायटी | २० | शिवणकाम |
| १७ | सुखशांती महिला विकास मंडळ | १५ | शिवणकाम |
| १८ | अलखिदमा महिला मंडळ पडेगांव | २५ | फ़ॅशन डिझायनिंग |
| १९ | आदर्श संस्कार प्रशिक्षण मंडळ एन-७ | २०<br>२० | स्क्रीन प्रिंटींग<br>वायरमन |
| २० | सावित्रीबाई फुले संस्कार प्रशिक्षण मंडळ | २५ | फ़ॅशन डिझायनिंग |
| | | ८२१ | |

प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.देसरडा प्रशांत :या प्रस्तावात असे नमूद केले आहे की ज्या संस्थेकडे प्रशिक्षणार्थी पाठवायचा प्रस्ताव मा.आयुक्ताकडे सादर करण्यात आला आहे. अदयाप संचिका अप्राप्त आहे. आयुक्तांची मान्यता नाही तर का सादर केलेला आहे तसेच महाराष्ट्र शासनाने इतर महानगरपालिकेला अशा प्रकारचे प्रशिक्षण देण्यासाठी कोणत्या संस्थेची नावे दिलेली आहे व या महानगरपालिकेसाठी कोणत्या संस्थची नावे प्रशिक्षणासाठी दिलेली आहे.महाराष्ट्र शासनाचे काही गाईडलाईन्स आहेतका ?की कोणत्या संस्थेमार्फत करावे याचा खुलासा करावा.

मा.महापौर :प्रकल्प संचालक यांनी सविस्तर खुलासा करावा.

प्रकल्प संचालक :कोणत्याही स्थानिक संस्थेकडे प्रशिक्षणार्थी पाठवू शकतो तसे नोदंणीकृत शासनाचे आदेश आहे. हेच गाईडलाईन्स शासनाचे आहेत.

श्री.प्रशांत देसरडा :माझ्या माहिती प्रमाणे शासनाने हे प्रशिक्षण देण्यासाठी महाराष्ट्र उदयोजक केंद्र जे रेल्वेस्टेशन रोडवर आहे त्या मार्फत प्रशिक्षण देण्याचे निर्देश आहे.

प्रकल्प संचालक :असे बंधनकारक नाही असे जिल्हाधिकारी यांनी आदेश दिलेले आहे.विषय समितीकडे हा प्रस्ताव पाठविलेला होता. स्वाक्षरीसाठी मा.आयुक्ताकडे सादर केलेले आहे.

सौ.लता दलाल :ज्या संस्थांचे नावे नमूद केलेले आहे एवढयाच संस्थैचे अर्ज आलेले होते का आणखी काही संस्थाचे अर्ज आलेले आहेत. महाराष्ट्र उदयोजक केंद्र यांना या संदर्भात प्राधान्य दयावे असे शासनाचे आदेश होते का?असे निर्देश असेल तर त्यांचा उल्लेख ठरावात का केलेला नाही तसेच इतर काही संस्थानी अर्ज केले असतील तर त्याची नावे का नमूद केलेली नाही संपूर्ण खुलासा करावा.

प्रकल्प संचालक :या संदर्भात प्रकल्प विभागाच्या नोटीस बोर्डवर जाहीर नोटीस लावण्यात आलेली होती. तसेच महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयासमोर नोटीस बोर्डवर सूचना लावण्यात आलेली होती.

सौ.लता दलाल :वृत्तपत्रात का देण्यात आलेले नाही. एखादी संस्थे असेल ते महानगरपालिकेत येवू शकत नसेल तर त्यांना कशी माहिती होणार आहे.

श्री.संजय जोशी :रूपये ८.२१ लक्ष खर्च होणार आहे ए-१,बी-१ म्हणून निविदा वृत्तपत्रात येणे आवश्यक होते.

मा.आयुक्त :यात काही स्पर्धा नाही. जी कोणती संस्था रजिष्टर्ड असेल ती प्रशिक्षण देवू शकेल. प्रत्येक वर्षी याप्रमाणेच कार्यवाही झालेली आहे.

श्री.संजय जोशी : या संबधीची स्थानिक वृतपत्रात जाहीर प्रगटन दिले असते तर आणखी अर्ज प्राप्त झाले असते.जाहीर प्रगटन करणे आवश्यक होते. इतरही संस्थानी अर्ज सादर केले असते.

मा.आयुक्त :सभागृहाला तसे वाटत असेल तर वृत्तपत्रात देवून कार्यवाही करण्यात येईल.ज्या संस्था निवडल्या आहेत त्यांचेकडे कॉलीफिकेशन आहे त्यांचीच निवड केलेली आहे. वृत्तपत्रात जाहीर प्रगटन दिले असते तर आणखी संस्थानी अर्ज केले असते. आजपर्यत नोटीस बोर्ड लावून कार्यवाही होत होती. सभागृहाचे मत असेल तर वृत्तपत्रात जाहीर प्रगटनदेवून कार्यवाही केली जाईल. प्रस्ताव परत घेण्यात येतो.

मा.महापौर : प्रस्ताव परत घेण्यास मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे प्रस्ताव परत घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र. १०४/७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद महानगरपालिकेचे मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र प्रकल्पासाठी नियमावलीचा प्रस्ताव विषय क्र.०४/ दिनांक १७.०६.२००५ अन्वये मा.सर्वसाधारण सभेपुढे सादर केला होता.सदरहू प्रस्तावा अनुषंगाने मा.महापौर यांनी पत्र जा.क्र./ १५१/ दिनांक १/७/२००५ अन्वये पाहणी समिती गठीत केली होती. सदरहू पाहणी समितीने पुणे महानगरपालिकेच्या मौलाना अबुल कलाम आझाद स्मारकास व पुणे महानगरपालिका कार्यालयास दिनांक १/९/२००५ रोजी भेट दिली आहे. पाहणी समितीने या बाबतचा अहवाल तयार केला असून सदर अहवाल अवलोकनार्थ पुढे नमुद केला आहे. तरी यापुर्वीच प्रस्तावित केल्या प्रमाणे या दृष्टीने संशोधन केंद्र कार्यान्वीत करण्यासाठी पुढील उद्यीष्टे/कार्य करण्यासाठी मानस आहे.

**अहवाल :** औरंगाबाद महानगरपालिकेचे मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र अनुषंगाने मा.सर्वसाधारण सभेचे विषय क्र.०४/दिनांक १७/६/२००५ संदर्भात मा.महापौर यांनी त्यांचेकडील पत्र क्र.१५१ दि.१/७/२००५ अन्वये गठीत केलेल्या पाहणी समितीने पुणे महानगरपालिकेच्या भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद स्मारक यास दि.१/९/२००५ रोजी पाहणी केली. पाहणी सदस्य यांनी पाहणी दौरा बाबत संक्षिप्त टिप्पणी येणे प्रमाणे सादर केली की,

पुणे महानगरपालिकेचे भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद स्मारक कामावर एकूण खर्च रू.४९०.०० लक्ष झालेला आहे. या कामासाठी खर्चाचा निधी संपूर्णत: पुणे महानगरपालिके मार्फत भांडवली खर्चाखाली केलेली आहे. यासाठी कुठलेही अनुदान व निधी प्राप्त झालेली नाही.

प्रस्तुत स्मारकाचे जागेचे क्षेत्रफळ ८९६३.०० वर्गमीटर आहे. स्मारकाची इमारत प्रशस्त व आर.सी.सी. बांधकामात दोन मजली आहे. दोन मजल्याचे एकत्रित बांधीव क्षेत्र २३३००.०० वर्गफुट एवढे आहे. इमारतीचे दर्शनी भागात गार्डन (लॉन) व दोन कारंजे असून इमारतीचे डेकोरेटीव्ह इलिव्हेशन नजरेत भरणारे आहे.

इमारतीचे तळमजल्यावर मुख्य फॉयर, वाचनालय, कार्यालय,संगणक कक्ष, बहुउद्देशीय हॉल, आर्ट गॅलरी, म्युझीअम हॉल, पॅन्ट्री काऊन्टर, या सुविधा आहेत. इमारतीचे पहिल्या मजल्यावर २७५ आसनी प्रशस्त व सुसज्ज कान्फरन्स हॉल या सुविधा आहेत.

पाहणी सदस्य यांनी प्रकल्प पाहणी करून त्यानंतर पुणे महानगरपालिका मुख्य कार्यालयास भेट दिली मुख्य कार्यालयात पाहणी सदस्य यांनी अधिक्षक अभियंता श्री.मा.र.लाटकर यांना स्मारक प्रकल्पाबाबत माहिती पुरविण्यास सांगितले पाहणी सदस्य यांना या अनुषंगाने येणे प्रमाणे माहिती अवगत केली की,

सदर प्रकल्पासाठी नियमीत स्वरूपात सल्लागार समिती गठीत केलेली नाही तथापी त्या शहरातील प्रकल्पाबाबतचे जाणकार व व्यासंगी मान्यवरांचे वेळोवेळी मौखीक मार्गदर्शन प्रकल्पासाठी उपलब्ध होते. तसेच प्रकल्प कार्यान्वयनासाठी अद्याप नियमावली तयार केली नसल्याची माहिती झाली. उर्दू व्यासंग असलेले व्यक्तीची व्यवस्थापक म्हणून नियुक्ती आवश्यक राहील. तरी पाहणी दौऱ्याचा संक्षिप्त ठिप्पनी अहवाल पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात येतो. पुणे महानगरपालिकेकडून स्मारक बांधले आहे, औरंगाबाद महानगरपालिकेकडे संशोधन केंद्र बांधले आहे.

| | |
|---|---|
| १. मा.श्री.तरविंद्रसिंग धिल्लन (विरोधी पक्षनेता) | स्वाक्षरीत |
| २. मा.श्री.रशिद मामु (स.न.से) | स्वाक्षरीत |
| ३. मा.सौ.लता दलाल (स.न.से.) | स्वाक्षरीत |
| ४. मा.श्री.जावेद हसन खान (स.न.से) | स्वाक्षरीत |
| ५. मा.श्री.संजय जगताप (सभापती प्र.अ.) | स्वाक्षरीत |
| ६. मा.श्री.अखिल अख्तर (पत्रकार) | स्वाक्षरीत |

**प्रस्ताव :**

१. मौलाना अबुल कलाम आझाद यांचे नवभारत निर्माण कार्याचे वैचारीक व्यासपीठ म्हणून संशोधन केंद्र कार्यरत राहील.

२. मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र महानगरपालिका औरंगाबाद, केंद्राचे प्रशासकीय कामकाज, व्यवस्थापन इत्यादीसाठी महानगरपालिकचे विभाग प्रमुख दर्जाचे अधिकारी यांची व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती केली जाईल. सदर व्यवस्थापकीय संचालकास मराठी, इंग्रजी, हिंदी यासह उर्दू भाषा अवगत असणे (किमान उर्दू वाचता येणे) आवश्यक राहील. प्रथम ही नियुक्ती पाच वर्षासाठी असेल. नियुक्ती देणे, मुदतवाढ देणे इत्यादी सर्व अधिकार महानगरपालिका आयुक्त यांना राहतील. नगर सचिव यांना प्रथमत: व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्त करण्यासाठी प्रस्तावित करण्यात येते.

३. सल्लागार समितीचे सदस्य निवडण्याचा अधिकार मा.आयुक्तांना राहील. त्याचा सल्ला स्विकारणे महानगरपालिका आयुक्तांवर बंधनकारक राहणार नाही. सल्लागार समितीचे सदस्यांना इतर भाषासह उर्दू भाषा अवगत असणे अनिवार्य राहील.

४. संशोधन केंद्र प्रमुख म्हणून व्यवस्थापकीय संचालक राहतील त्यांना समन्वयक सहाय्य करतील. संशोधन केंद्राची कामे महानगरपालिकेचे आयुक्त यांचे मार्गदर्शनानुसार व्यवस्थापकीय संचालक पाहतील.

अ. प्रथम नियुक्ती सहा महिन्यासाठी असेल. मुदतपूर्व नियुक्ती रद्द करणे, मुदतवाढ देणे, नविन नियुक्ती करणे इत्यादी सर्व अधिकार महापालिका आयुक्तांचे राहतील.

ब. शैक्षणिक अर्हता :-
   १. कला शाखेची पदवी आवश्यक, पदव्युत्तर पदवी, पी.एच.डी.धारक यांना प्राधान्य राहील.
   २. इतर भाषा सोबतच उर्दू भाषेचा व्यासंग व अनुभव असावा.
   ३. प्रशासकीय जबाबदारीचे पदावरील किमान दहा वर्षाची सेवा असणाऱ्या निवृत्त अधिकारी देखील नियुक्तीसाठी पात्र राहतील.
   ४. वयाची अट राहणार नाही. काम करण्याची शारीरीक सदृढता पाहुन नियुक्ती देण्यांत येईल.
   ५. लिखाण व साहित्य यांची आवड असावी.

६. समन्वयक यांना एकूण मानधन प्रतिमाह रू.५,०००/- एवढे राहल, महानगरपालिका सेवेतील कोणत्याही सवलती व फायदे लागु राहणार नाहीत.

७. समन्वयक यांनी व्यवस्थापकीय संचालक यांच्या मार्गदर्शनाखाली व्यवस्थापन व सल्लागार या सेवेत पुढील कर्तव्ये समाविष्ट राहतील.
   १. संशोधन केंद्रास भेट देणाऱ्यांना आवश्यक मार्गदर्शन करणे.
   २. केंद्राचे उद्दीष्ट पूर्तीसाठी उपक्रमांची अंमलबजावणी करणे.
   ३. संशोधन केंद्राचे उद्दीष्टांशी सुसंगत वैचारीक ग्रंथ संपदा व साहित्य वा कलाकृती खरेदी करणे किंवा देणगी स्वरूपात स्विकारणे.
   ४. संशोधन केंद्राचे उद्दीष्ट पूर्तीसाठी समन्वयक यांनी व्यवस्थापकीय संचालक यांचे मार्फत मा.आयुक्त यांचे मंजूरी अधीन समयबध्द कालावधीत विचारवंताची व्याख्याने,चर्चा सत्रे, परिसंवाद,कार्यशाळा आयोजन करणे आणि संशोधन केंद्राचे उद्दीष्टा अनुरूप प्रबंध,लेख व साहित्य संकलीत करणे व प्रकाशीत करणे.
   ५. या संबंधीच्या कार्याचा मासिक अहवाल मा.आयुक्तांना सादर करणे.

८. उत्कृष्ट साहित्य कलाकृती पुरस्कारीत करण्यासाठी खर्चाची मर्यादा पुढे नमुद केल्याप्रमाणे राहील.

अ. संशोधन केंद्राची कार्य स्वरूपात साहित्य प्रकाशनासाठी प्रतिवर्षी रू.२५,०००/- मर्यादित खर्चास मान्यता राहील.

९. संशोधन केंद्राचे कार्याचा भाग म्हणून उत्कृष्ट साहित्य निर्मितीस चालना देण्यासाठी पुरस्कार स्वरूपात पुढील खर्चास मान्यता राहील. उत्कृष्ट साहित्याचे निकष व्यवस्थापकीय संचालक व सल्लागार समिती यांनी निश्चित केल्याप्रमाणे राहील व महापालिका आयुक्तांची मंजुरी घेणे आवश्यक असेल.

१०. संशोधन केंद्रातर्फे उत्कृष्ट साहित्य निर्मितीसाठी

अ. आंतरराष्ट्रीय पुरस्कार रू.१,०००००/- (रूपये एक लक्ष) रक्कमेचा निधी व स्मृतीचिन्ह स्वरूपात राहील.

ब. राष्ट्रीय पुरस्कार रू.५१,०००/- (रूपये एक्कावन हजार) एवढ्या निधीचा व स्मृतीचिन्ह स्वरूपात राहील.

क. उपरोक्त पुरस्कारासाठी दर्जेदार साहित्य निवडीस संधी देण्यासाठी योग्य स्तरावरील वर्तमान पत्रातुन प्रसिध्दी व उचीत व्यवस्थापनाची जबाबदारी समन्वय यांची राहील.

११. संशोधन केंद्राचे उद्यीष्ट पूर्तीसाठी सदस्य नोंदणीचे नियम पुढे नमुद आहेत.

१. मासिक/वार्षिक स्वरूपात सदस्य नोंदुण संशोधन केंद्राचा लाभ व्यापक स्वरूपात जनमानसात व्हावा यासाठी वाढीव सदस्य नोंदणीचे वार्षिक उद्यीष्ट पूर्तीची जबाबदारी समन्वयक यांची राहील.

२. दरवर्षी किमान २५ सदस्य संख्या वाढविणेची जबाबदारी समन्वयक यांची राहील.

१२. संशोधन केंद्राचे उद्यीष्टांशी सुसंगत कामासाठी वेळोवेळी करावयाच्या खर्चास मा.आयुक्तांनी मंजुरी अधीन राहुन व्यवस्थापन चालविणे आवश्यक राहील.

१३. संशोधन केंद्राची दैनंदिन कामकाजास आवश्यक कर्मचारी वर्ग मा.आयुक्त यांचे मंजुरीनुसार व्यवस्थापकीय संचालक यांचे व्यवस्थापनाखालील अस्थापनेवरील कार्यरत राहील. व समन्वयक यांचे पर्यवेक्षण, नियंत्रण राहील.

१४. संशोधन केंद्राच्या वापरासंबंधी.

१. संशोधन केंद्र सभागृहाचा वापर उद्यीष्टांशी सुसंगत व्हावा या दृष्टीने सभागृह व परिसर प्रतिदिन रू.१,०००/- शुल्क आकारून वैचारीक व्यासपीठ म्हणून संस्थांना वापरता येईल, राजकिय कार्यक्रमासाठी वापर अनुज्ञेय असणार नाही.

२. संशोधन केंद्रा संलग्न अतिथी कक्षास स्वतंत्रपणे रू.२००/- शुल्क आकारणी करून संशोधन केंद्र उद्यीष्टा सुसंगत कामासाठी वापरता येईल.

३. अतिथी कक्ष वापराचे निकष व्यवस्थापकीय संचालक, समन्वयक व सल्लागार समिती निश्चित करील व त्यास महापालिका आयुक्तांची मंजुरी घेणे आवश्यक राहील.

१५. संशोधन केंद्र वाचनालयासाठी सदस्य नोंदणी व सभासदांसाठी नियम पुढे नमुद केल्याप्रमाणे राहतील.

१. सभासद शुल्कासाठी वार्षिक शुल्क रू.२००/- आणि नोंदणी शुल्क रू.५०/- इतके राहील.

२. सभासदांसाठी एका वेळेस एक पुस्तक मिळु शकेल.

३. सभासदास दरवर्षी सभासदत्व शुल्क भरून सभासदत्व नुतणीकरण करणे आवश्यक राहील.

४. सभासदांनी पुस्तक वापराचे व पुस्तक परत करण्याचे नियम तसेच मुदतीत पुस्तक परत करण्यासंबंधीचे नियम महानगरपालिका वाचनालयाप्रमाणे राहतील.

१६. संशोधन केंद्राचे उद्यीष्ट पूर्तीसाठी महानगरपालिकेकडून वेळोवेळी केलेल्या नियमावली अधीन संशोधन केंद्राचे व्यवस्थापन कार्यरत राहील. तरी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.अ.रशिद खान :यात दुरूस्ती करावी कमेटी करावी जी कमेटी करणार आहात ती मा.महापौर मा.आयुक्त यांनी मिळून करावी. यात कवी संमेलन जे मराठी उर्दु असेल हिन्दी असेल त्यांचेसाठी तसेच जे विचारवंत असतील त्यांच्या बैठकीसाठी कलाकारासाठी नाम मात्र रूपये ५०० /-भाडे घ्यावे.

श्री.संजय जोशी :यात पदाधिकारी याची कायम स्वरूपी कमेटी होणार आहेत त्या जेष्ठ व अनुभवी स.सदस्य श्री. अ.रशिद खान याचा कमेटीमधे समावेश असावा.पदाधिकारी व सदस्य यांनी बसून योग्य तो निर्णय घ्यावा.

श्री.प्रशांत देसरडा :सर्व पदाधिकारी तसेच जेष्ठ सदस्य श्री. अ. रशिद खान यांनी या संदर्भात योग्य तो निर्णय घ्यावा.आर्थिक अनुदान मिळणे संदर्भात प्रयत्न करावा.

श्री.संजय जोशी :यात नगरसचिव यांना नियुक्त करणार आहेत. नगरसचिव याचेंकडे कामाचा जास्त व्याप आहे.

श्री.संजय सिरसाट :गेल्या सात आठ वर्षापूर्वी चांगली कल्पना पूढे आली की भारतातील मराठवाडीतील किंवा या शहरातील चांगले विदयार्थी या ठिकाणी यावे त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र स्थापन करण्यात आले. त्याप्रमाणे शिवाजी महाराज पुराण वस्तु संगृहालय स्थापन केले तसेच मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्रही स्थापन करण्यात आले. संशोधनाचा अर्थच काय हे कळायला मार्ग नाही. डॉ. बाबाहेसाब आंबेडकर संशोधन केंद्रामार्फत एकही व्यक्ती संशोधन करून दाखवले असे वाटत नाही. एका अर्थाने सदर महापुरूषाचा अपमान होत आहे सदर संशोधन केद्रांत कर्मचाऱ्याची बदली करण्यासाठी अधिकाऱ्याच्या बैठका होतात. कुणाची बढती करायची असेल तर त्या संबधीची कमेटीची बैठक तेथे होते या संशोधन केद्रांवर लाखो रूपये खर्च झाले परंतू संशोधन करून हे अमूक १० लोक आहेत व ते भारताच्या यादीमधे आहे अशी एकही घटना नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केद्रांत अमूक पूस्तके पाहिजे अमूक प्रतिमा आणायी परंतू मा.आयुक्तांना विनंती की आपण तेथे भेट दयावी व कुणीतरी दोन तरी व्यक्ती पुस्तेके वाचतांना दिसून येतात का ?पुणे येथे संशोधन केद्र तयार केलेले आहे. कमेटी पाहणीसाठी गेलेली होती. माहिती घेतली असता फक्त तेथे स्मारक उभारलेले आहे. कोणतीही नियमावली तेथे नाही. मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केद्राची जी इमारत झालेली आहे ती अत्यंत भव्य असून चांगली इमारत म्हणून पहावेसे वाटते. एवढी मोठी इमारत असतांना संशोधन करणारे व्यक्ती एक ते ही तेथे आले तर संशोधन करणार ही पध्दत अत्यंत चूकीची आहे असे माझे मत आहे.महानगरपालिकेमार्फत जे काही होईल त्याचा उपयोग या शहरातील नागरीकांना झाला पाहिजे. संशोधन केद्र हे नाव जरी असेल तरी वेगवेगळे उपक्रम तेथे झाले पाहिजेत आणि त्या संदर्भात नियमावली तयार झाली पाहिजे. या प्रस्तावात नियमावली ती वेगळीच आहे. संशोधना बाबत जे गाईड लाईन्स् पाहिजे ते यात नाही.यात ज्याची नियुक्ती करायची आहे त्याची पात्रता किती असावी अनुभव किती असावा मानधन किती दयायचे हे यात दिले आहे. हे सर्व करण्याआधी संशोधन काय करणार आहे हे नमूद करावे सचिव यांना व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती करावे यास माझा विरोध नाही जाती धर्मावर महानगरपालिकेचा कारभार चालत नाही अशी भावना झालेली आहे की छत्रपती शिवाजी पुराण वास्तु संगृहालय येथे मराठा डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रांत हा दलित मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केद्र येथे

मुस्लीम व्यक्ती असावयास पाहिजे. आतापर्यत शिवाजी महाराज पुराण वस्तु संग्राहालयात किती लोकांनी व्हिजीट दिल्या. किमान महानगरपालिकेच्या शालेय विदयाथर्यांना तरी ते दाखवा तेथे काय ठेवलेले आहे. परंतु तेथे प्रवेशासाठी ५ रूपये ठेवण्यात आले . माझी अशी विनंती आहे की हया ज्या काही वास्तूवर जे कर्मचारी नियुक्त आहे त्याचा खर्च व इतर खर्च हा अनाठायी होत आहे तो बंद झाला पाहिजे करोडो रूपये खर्च करतो हे थांबले पाहिजे जातीच्या नावावर कूणी राजकारण यापूढे करू नये चांगली इमारत झालेली आहे मराठी नाटय क्षेत्रातील हिन्दी नाटय क्षेत्रातील कवी असतील कलाकार असतील त्यांना प्रशिक्षणासाठी देण्यात यावे जी नियमावली दिली ती चुकीची आहे असे मत सभागृहात व्यक्त केले त्यासाठी कमेटी नियुक्त करावी वेगळे गाईडलाईन्स् दयावे नसता पून्हा त्या वास्तूचा दूरउपयोग होवू शकतो हे मुद्दामहून नमूद करतो सर्व समाजातील लोकांना तेथे जाता आले पाहिजे सांस्कृतिक कार्यक्रम घेता आले पाहिजे. वेगळी नियमावली तयार करावी जे की सर्वांना हे संशोधन केद्र खुले असले पाहिजे

श्री.अ.रशिद खान :सभागृह नेता यांनी जे मत व्यक्त केले त्यासी सहमत आहेत.मौलाना अबुल कलाम आझाद यांनी देशासाठी काय केले म्हणून काही लोकांनी न्यायालयीन प्रकरण केले होते त्यांचे बाजूने निकाल लागला नाही त्यानंतर हे संशोधन केद्र अगोदर अमखास मैदान या ठिकाणी होणार होते त्यानंतर मजनूहिल येथे करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्या बाजूला हिन्दू समाजाचा सुध्दा परीसर आहे. मौलाना अबुल कलाम आझाद यांनी जी पुस्तेके लिहीली ती सर्व उर्दू भाषेत लिहिली आहेत. मौलाना आझाद यांचे उर्दू भाषेतील साहित्य,त्यांनी लिहीलेली पूस्तके व त्यांनी त्यावेळेस काढलेली वृत्तपत्रे या सर्वांचे इतर भाषामध्ये भाषांतर करावे. जेथे जेथे पुस्तके असतील,साहित्य असेल ते जमा करण्यात यावे. तसेच त्यांची एखादी वस्तु उपलब्ध होत असेल तर त्याचे देखील जतन करण्यांत यावे. त्यांनी दिल्ली जामा मस्जिदवर उभे राहून ज्यांना कुणास पाकीस्तानला जायचे असेल त्यांनी जावे मी या देशाचा नागरीक आहे मी जाणार नाही असे म्हटले होते. त्यांचा नारा जो होता तो त्यांनी शेवट पर्यत लढविला. त्यांनी देशासाठी काय काय केले,त्याचा प्रचार व प्रसार व्हावा व त्याबद्दल वर्षातून दोन-तीन वेळेस कार्यक्रम घेण्यात यावे. ते मोठे महान होते मुस्लीम व्यक्ती तेथे असावे असे काही नाही ज्यांना उर्दू येते त्यांना घेता येईल त्यांनी पुस्तेके ही उर्दू मध्ये नसती तर हिन्दी इंग्रजी माध्यमची पुस्तके ठेवू शकलो असतो. पूणे शहरात अनेक मोठमोठया लोकांना उर्दू येते त्यांना येथे नियुक्त करू शकता. जो हॉल केलेला आहे त्यात कवी समेंलन असेल व सांस्कृतिक प्रोग्राम असतील त्यासाठी देवू शकतो सर्व बाबीचा विचार करून योग्य तो निर्णय घ्यावा.

श्री.संजय सिरसाट :ज्ञानेश्वर सारखे व्यक्ती यांनी १७ व्या वर्षीची ज्ञानेश्वरी लिहिली ती ६० वर्षाच्या व्यक्तीलाच कळते असे नाही तर ४० वर्ष वयाच्या व्यक्तीलाही समजू शकते.

श्री.अ.रशिद खान :माझे मत तर असे की १६ व्या वर्षाच्या व्यक्तीला सुध्दा कळायला पाहिजे ज्यांचे देशावर प्रेम आहे जालीयानवाला बाग कडून पदयात्रा येत होती ती येवून औरंगाबाद पर्यत पूर्ण झाली २०० लोकांना फाशीची शिक्षा देण्यात आली या ठिकाणी ते शहीद झाले. १६ वर्षाच्या व्यक्तीची नियुक्ती करू शकता दूमत नाही.दुरूस्ती करून मंजूर करावे.

सौ.विजया रहाटकर :संशोधन लेख साहित्य ई. बाबत संशोधन केद्रांची उद्दिष्ट स्पष्ट केले नाही कोणत्या कामासाठी केले ते स्पष्ट दिले नाही त्याची नियमावली जे की उद्दिष्ट

अगोदर समाविष्ट होणे आवश्यक आहे अमूक कामासाठी हे संशोधन केद्र आहे जे जनतेपर्यंत गेले पाहिजे. संशोधन केद्रांची कार्य स्वरूपात साहित्य प्रकाशनसाठी दरवर्षी २५ हजार अंतर राष्ट्रीय पूरस्कार १ लक्ष आण राष्ट्रीय पूरस्कार ५१ हजार असे दिले परंतू संशोधन कोणत्या प्रकारचे करणार याचा उल्लेखच नाही. पुरस्कारासाठी अमूक विषयावर संशोधन केले हे कसे पाठविता येईल. योग्य निर्णय घेण्यासाठी समिती गठीत करावी त्या समितीने विषय निवडावे व त्या विषयावर संशोधन करून आंतरराष्ट्रीय स्थरावर गेले पाहिजे पुरस्कार मोठा परंतू संशोधनाचा बोध नाही असे होवू नये आताच स.सदस्य श्री सिरसाट संजय यांनी जी सूचना केली त्याप्रमाणे दुरूस्त्या करून विषय निश्चित करून उद्दिष्ट निश्चित करून पून्हा हा प्रस्तावसभागृहात सादर करावा अशी विनंती आहे.

श्री.अ. रशिद खान :जो ही कुणी व्यक्ती मौलाना अबुल कलाम आझाद यांचेवर संशोधन करील पीएचडी करेल त्यात भारतातील सर्व नागरीक विदयार्थी येवू शकतील, तेथे जो हॉल केला तेथे कलाकार येतील आवश्यकत्या  दुरूस्त्या करून योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

श्री.संजय जोशी :पाच पदाधिकारी तसेच मा.आयुक्त व जेष्ठ स.सदस्य व माजी महापौर श्री.अ.रशिद खान मामू याची एक कमेटी करून या संदर्भात योग्य तो निर्णय घ्यावा सभागृहाचा पाठींबा आहे.

मा.महापौर :दूरूस्तीसह प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे. कमेटी मधे पाच पदाधिकारी तसेच मा.आयुक्त व जेष्ठ स.सदस्य  माजी महापौर श्री.अ.रशिद खान मामू यांचा समावेश करण्यात येतो. यात आवश्यक ती दुरूस्ती करून कमेटी योग्य तो निर्णय घेईल.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावास दुरूस्तीसह मंजुरी देण्यांत येते.  मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करून समितीमध्ये  मा.पदाधिकारी, मा.आयुक्त तसेच ज्येष्ठ स.सदस्य श्री.अ.रशिद खान (मामु) यांचा समावेश करण्यास आणि सदर संशोधन केंद्र कार्यान्वित करणेसाठी नियमावलीत आवश्यक ते बदल करून निर्णय घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.  वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०५/८ :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद शहरातील विविध ठिकाणी जुन्या जलवाहिन्या काढून त्याठिकाणी नविन जलवाहिन्या टाकण्याकरीता तसेच दाट लोकवस्तीतील जुन्या खराब झालेल्या व दुषीत पाण्याच्या तक्रारी ज्या भागातून जास्त येत आहे, अशा ठिकाणी जलवाहिन्या टाकण्याच्या विविध कामांना मा.सर्वसाधारण सभेने अर्थसंकल्पाद्वारे मंजूरी दिलेली आहे.  अर्थसंकल्पामध्ये शहरामध्ये विविध भागातील कामे आहेत.  या कामाकरीता लागणारे डी.आय.के. (K-९ व K-७) पाईप एकत्रीत खरेदी करून महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागामार्फत संबंधीत कामाचे मंजूर कंत्राटदारास पुरवठा करून, पाणी पुरवठा विभागाची सन २००५-०६ या आर्थिक वर्षाची कामे करण्याचे योजीले आहे.  या एकत्रीत खरेदीमूळे पाईपांचे उत्पादन करणाऱ्या व गुणवत्ताधारक कंपनीमार्फत खरेदी होईल तसेच एकत्रीत खरेदीमूळे महानगरपालिकेस मागील कामांच्या अनुभवानूसार आर्थिक फायदा होईल.

उपरोक्त बाबी विचारात घेता व मा.आयुक्तांचे मान्यतेनुसार सर्व कामांची एकत्रीत यादी करून त्यातील आवश्यक पाईपच्या अद्यावत दरसूचीनुसार अंदाजपत्रकीय रक्कम काढली असता ती रूपये ४,०३,२५,८२४/- (३% Contingences सह) एवढी येते.

तरी प्रस्तावास मान्यता मिळाल्यास निविदा काढून थेट फक्त पाईप उत्पादकांकडून अथवा त्यांच्या अधिकृत विक्रेत्याकडून दर मागविण्यात येतील.  तरी रूपये ४,०३,२५,८२४/- चे पाईपची (D.I.K-7

and K-9 Pipe) खरेदी करण्याच्या व तसेच त्यानुषंगाने प्रकरणी आवश्यक कारवाई करण्याचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.सलीम पटेल :एकत्रित पाईप खरेदी न करता आवश्यकता पडेल त्याप्रमाणे खरेदी करण्यात यावे.

श्री.सय्यद खुसरो :चार दिवसापासून पिण्याचे पाणी नाही काल पून्हा जोडणी केलेली जलवाहिनी फुटलेली आहे. खुलासा घेण्यात यावा.

मामहापौर :या संदर्भात अगोदर चर्चा झालेली आहे. आपण उशीरा सभागृहात आलेले आहात.

श्री.कोकाटे काशिनाथ :गेल्या दोन वर्षापूर्वीपासून पाणी पूरवठयाच्या विकास कामा संदर्भात काही निविदा काढण्यात आलेल्या होत्या. निविदा हया . अंदाजपत्रकापेक्षा जास्त किमतीच्या येतात म्हणून त्या संचिका मंजूर करण्यात आलेल्या नाही. दोनवर्षापूर्वी कामाची निकड लक्षात घेता ही कार्यवाही केलेली होती परंतू तेथे अदयापही कामे झालेली नाही. तेथे सी. आय किंवा डी. आय चे पाईप टाकायचे की इतर टाकायचे इतर महानगरपालिकेत काय परीस्थिती आहे ही माहिती घेण्यात वेळ गेला व प्रशासनातील अधिकारी योंना आता शासनाचा अध्यादेश सापडला की डीआयके पाईप टाकायचे म्हणून तसा प्रस्ताव समोर सादर केलेला आहे.दोन वर्षापूर्वी ज्या भागात पाणी पूरवठा करण्यासाठी ज्या कामाच्या निविदा काढल्याहोत्या तेथे काम करण्याची गरज होती. एक तर कामाची गरज नसेल म्हणून काम झाले नाही तर निविदा कशासाठी काढल्या व गरज होती तर निविदा काढूनही कार्यवाही का केलेली नाही त्या कामाची परीस्थिती काय आहे तसेच चार कोटीचा प्रस्ताव ठेवलेला आहे यातून या आर्थिक वर्षात किती रक्कमेची कामे होणार आहे याचाही खुलासा करावा.

श्री.ताठे भाऊसाहेब :गेल्या दोन वर्षात माझ्या वार्डातपाणी पूरवठयाची विकास कामाचे संदर्भात १० लक्षचे टेंडर काढले होते. पाच वेळेस टेडर काढून ही कामे झालेली नाही ते काम या वर्षीच्या अर्थसंकल्पातून रद्य करण्यात आलेले आहे. त्या कामाचा समावेश करावा.

शहर अभियंता : या वर्षात पाणी पुरवठयाची जी पाईप लाईनचे कामे करायची आहे त्याचे सर्व अंदाजपत्रक तयार केलेले आहे. त्यासाठी जे डी.आय चे पाईप लागणार आहे. लेबर चार्जेस वगळून जो पाईप साठी खर्च लागणार आहे. त्याचा एकत्रित खर्च किती येईल ते विचारात घेवून सर्वसाधारण सभेच्या मंजूरीसाठी प्रस्ताव ठेवलेला आहे.

श्री.संजय सिरसाट :प्रशासनाच्या कामाच्या ज्या प्रोसेस चालतात त्यास वेळ लागतो म्हणून वार्डात कामे होत नाही. असा स.सदस्यांचा रोष आहे. वार्डात विकास कामे केंव्हा चालू होणार आहे मा.आयुक्तांनी खुलासा करावा.

मा.आयुक्त :बजेटमधे जी पाणीपूरवठयाची कामे आहेत त्यासाठी पाईप खरेदी करावे लागणार आहे असे सर्व कामासाठी जो पाईपसाठी खर्च लागणार आहे त्याचा प्रस्ताव मंजूरीसाठी ठेवलेला आहे. यामूळे पैशाची बजत होईल त्यामूळे एकत्रित टेंडर काढण्यात येत आहे.याच बरोबर लेबर चार्जेस खर्चा संदर्भातही लवकरच टेंडर काढणार आहोत. चार कोटीचे काम आहे. ३० दिवसाची मुदत दयावी लागेल. दीड महिणा काम सूरू करण्यास लागेल.

श्री.काशिनाथ कोकाटे :मी जो प्रश्न विचारला त्याचा खुलासा दिलेला नाही. प्रशासनाला कामच करायचे नसेल तर तसे सांगावे.यावरील सर्वच खर्च वाचेल. सर्वच कामे होतील असा विश्वास मा.आयुक्तांनी प्रत्येक बैठकीत देत आलेले आहे. परंतु एकाही कामास सुरूवात केलेली नाही. गेल्या वर्षीची स्पील ओव्हरची कामे सुध्दा अदयाप झालेली

नाही. किती दिवसात स्पिल ओव्हरची कामे झाली पाहिजे कोणते काम केंव्हा व किती कालावधीत झाले पाहिजे. याचे प्रशासनाकडे कोणतेही नियोजन नाही. नियोजन शुन्य कारभार चालू असून अदयाप कोणत्याही वार्डात विकास काम चालू झालेले नाही.प्रशासनाच्या मनाला वाटले तर एजन्सीच्या नुसार काम करायचे नसेल तेंव्हा शासनाच्या जी.आरची अमलबजावणी करायची हे कुठेतरी बंद झाले पाहिजे. एकतर शासनाच्या जीआर नुसार काम करावे नसता जे समोर आहे त्या प्रमाणे स्वच्छ मनाने काम करावे. अशी आमची भुमीका आहे. एका अधिकाऱ्यानी म्हटले तीन वर्षासाठी अेसी पाईप वापरायचे नाही शासनाचा जीआर आहे तर का वापरण्यात आलेले आहे याचा खुलासा करावा.कुण्या अधिकाऱ्याच्या मर्जीप्रमाणे काम करण्यात येवू नये पारदर्शकपणे काम झाले पाहिजे. चार कोटीचे पाईप खरेदीचा प्रस्ताव आज सभागृहात येतो. गेल्या सहा महिण्यात कोणते पाईप वापरण्यात आले. कोणत्या वार्डात काम झालेले नाही यास जबाबदार कोण आहे. वार्डात विकास कामे झाली नाही तर जनता आम्हाला जाब विचारणार आहे. या प्रस्तावानुसार किती रक्कमेची कामे यावर्षी होणार आहेत व स्पील ओव्हरची किती कामे बाकी आहे याचाही खुलासा करण्यात यावा.

मा.आयुक्त :अेसी पाईप हे शहरी भागात वापरायचे नाही असे शासनाचे आदेश आहेत. यापूर्वी वापरले असतील परंतू यानंतर वापरण्यात येणार नाही. डीएसआर प्रमाणे मान्य करतो त्यात नमूद केलेले आहे.आपण डी.एस.आर ॲडप्ट केलेला आहे. जी कामे कराची आहे त्या सर्व कामासाठी एकत्रित पाईप खरेदीचे टेंडर काढायचे आहे. त्याच बरोबर लेबर चार्जेस टेंडरही काढावे लागतील. हा प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर कमीत कमी दीड ते पावने दोन महिणे टेडर अंतिम करण्यात लागतील. किमान दोन महिण्यानंतर काम सूरू होतील. जूने जे काम अेसी पाईप खरेदी करून मंजूर झाले असतील वर्क ऑर्डर दिल्या नसतील ती कामे होणार नाही. प्रशासन ते काम करणार नाही. जो पाईप लागेल त्याची किमत जास्त असते एकत्रित टेंडर काढण्यात येतील. यामूळे महानगरपालिकेस किमान १५ ते २० टक्के फायदा होईल. शासनाच्या आदेशानूसार कामे करावी लागतील. प्रशासन कूठे चूकत असेल तर तसे निदर्शनास आणून दयावे.

श्री.काशिनाथ कोकाटे : जूलै मधे बजेट मजूर झालेले आहे. डीआय के पाईप वापरण्याचे शासनाचे स्पष्ट आदेश असेल तर कामे होण्यास का उशीर झालेला आहे. शासनाचे आदेश जे आलेले आहे कोणत्या तारखेला आलेले आहे खुलासा करावा.शासनाने आदेश आल्यानंतरही किती कामे ही अेसी पाईप टाकून करण्यात आलेली आहे व धुळे नाशिक पूणे महानगरपालिकेत कोणते पाईप वापरले जातात याचाही खुलासा करावा.

मा.आयुक्त : इतर महानगरपालिकेत कोणते वापरले जातात यापेक्षा शासनाचे जे जीआर प्राप्त झालेले आहे त्यानूसार कार्यवाही करीत आहोत. दुसरे असे की एमजीपीने काढलेले तांत्रिक डायरेक्शन आहे. ते कुणाच्या मनाचे रहात नाही.

श्री.कोकाटे काशिनाथ :एमजीपीआरचे तांत्रिक बाबी महानगरपालिकेस बंधनकारक आहेत का असेल तर जी ६७ कोटीची योजना होती त्यात मा.आयुक्तांनी एमजीपीआरचा टेक्नीकल मुद्या कसा उपस्थित केला.

मा.आयुक्त :६७ कोटीच्या योजनेत तांत्रिक मुद्या प्रशासनाने निर्माण केलेला नाही एमजीपीने तो उपस्थित केलेला आहे.

श्री.कोकाटे काशिनाथ :आताच खुलासा केला की एमजीपीने तांत्रिक बाब काढली म्हणून योजना झाली नाही. जी निविदा काढण्यात आली होती ती एमजीपीच्या सल्यानुसार झालेली आहे. त्यानुसार ही योजना अमलबजावणीसाठी आलेली होती. ६७ कोटीच्या योजने च्या माध्यमातून ज्या निविदा काढलेल्या आहेत त्या सर्व बरोबर नाही का त्याची अमलबाजवणी कशी करणार आहोत.

मा.आयुक्त :६७ कोटीची जी योजना होती ती एमजीपीनेच मंजूर केलेली होती. आणि एमजीपीनेच टेक्नीकल मुद्या काढलेला आहे. तो सदस्य सचिव एमजीपीने उचललेला मूद्या आहे.जर त्याची स्पीड १.२२ होत असेल तर १.६६ प्रमाणे स्पीड कशी केली मी एमजीपीला असे म्हटले की जर सदस्य सचिवचे असे मत असेल तर एमजीपीनेच योग्य निर्णय घेवून दयावा असे कळविले. सदस्य सचिवांचे पत्र आलेले आहे. ते वाचल्यानंतर मी पत्र दिलेले आहे.

श्री.काशीनाथ कोकाटे :या शहरामधे अनेक वसाहती पाण्यापासून वंचित आहे. नाथसागर हा तूंडूब भरलेला आहे. पाण्याच्या बाबतीत अशी भौगोलिक परीस्थिती कोणत्याही शहराला नाही. असे असतांना देखिल प्रशासन असे चालते की आयुक्त बदललेकी कामाचे स्वरूप बदलते. बदली होवून नवीन आयुक्त आले तरी त्यांनी फाईल टू फाईल बघीतली पाहिजे. प्रशासन टेक्नीकल बाबीकडे जाते व अनेक वसाहती पाण्यापासून वंचीत आहे. व योजना कशी बारगळली जाईल असे काम प्रशासनाचे चालू आहे असे वाटते. पाणी पुरवठयाची दुरावस्था झालेली आहे. या शहराला किती पाण्याची आवश्यकता आहे. असे असतांना देखिल प्रशासन का कार्यवाही करीत नाही. जे जीवन प्राधिकरण विभागाचे अधिकारी महानगरपालिकेत आहे.त्यांचे मार्फतमहानगरपालिकेतील अधिकारी प्रशिक्षित करू शकलो नाही अशी परीस्थिती आहे. किती वसाहतीना पाणी दिले जात नाही किती पाण्याची आवशयकता आहे व केंव्हा पाणी पूरवठा सुरळित होणार आहे दोन वर्षापूर्वीचे स्पील ओव्हरची कामे बाकी आहे ते का राहिले हा सर्व खुलासा करण्यात यावा.

शहर अभियंता औरंगाबाद शहरासाठी हर्सूल तलावातून ५ ते ७ व जायकवाडी तलावातून ११० ते ११५ एमएलडी पाणी पूरवठा होतो. जूलै मधे बजेट मंजूर झालेले होते. अेसी पाईप वापरायचे नाही असा शासनाचा ९७-९८ चा जी.आर आहे. या पाईप मधून वेस्टेजचे प्रमाण जास्त असते. शहरात वाहतून मोठया प्रमाणात असते त्यामूळे सीआय किंवा डीआयके पाईप वापरण्याचे शासनाचे निर्देश आहे.

श्री.सलीम पटेल :अेसी पाईपमधे कॉस्मोलेटिक मटेरियल त्यात असते .सर्वसामान्याच्या तब्बेतीला धोका असतो म्हणूनशासनाने बंदी घातलेली आहे असे माझे मत आहे.शासनाची बंदी असतांना सुध्दा गेल्या सात वर्षापासून आपण अेसी पाईप वापरत आहोत. याचा अर्थ आपण नागरीकांच्या जीवनाशी खेळतो आहे.

श्री.कोकाटे काशिनाथ :१९९७ ला शासनाचा जी.आर असतांना अेसी पाईप का वापरण्यात आले. यास कोण दोषी आहे. कार्यवाही झाली पाहिजे.

श्री.मुजीब खान :मा.आयुक्त नेहमी सांगतात शासनाचे निर्देशानूसार प्रशासन काम करेल परंतू आयुक्त यांना रूजू होवून सहा महिने झालेले आहे ही बाब मा.आयुक्त यांचे लक्षात का आलेली नाही. गेल्या पाच ते सात वर्षापासून अेसी पाईप टाकण्याची शासनाची बंदी असतांना ते टाकून विकास कामे होत आली .या त दोषी कोण आहे याची चौकशी झाली पाहिजे.

श्री.काशिनाथ कोकाटे :या शहरामधे अनेक ठिकाणी अेसी पाईप टाकलेले आहे. ते काढण्यासाठी व तेथे नवीन पाईप टाकण्यासाठी किती खर्च लागणार आहे. या संबधी प्रशासनाने काय उपाययोजना केलेली आहे. माहिती देण्यात यावी.

मा.आयुक्त :शासन जो आदेश आहेत तो जूना आहे. त्यावेळी मी सांगली येथे आयूक्त म्हणून कार्यरतहोते त्यामूळे मला त्याची आठवण होती. अेसी पाईप टाकून कार्यवाही न करण्याचे अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. एकाच वेळी अेसी पाईल बदलून डी.आय.के. टाकणे फिजीकली वएकाच वर्षात शक्य नाही. परंतू यापूढे ज्यावेळी रिप्लेस करू त्या त्या वेळी ते टाकण्यात येतील.पूर्णपणे रिप्लेस करणे शक्य नाही.हा प्रस्ताव मंजूर झाल्यास कामास दोन महिण्यात सूरूवात होईल.

श्री.अ.रशिद खान :या अेसी पाईप मूळे कॅन्सर होवू शकतो असे शासनाचे मत आहे. ही बाब सत्य आहे. जर असेल तर गेल्या सात वर्षापासून शासन आदेश असतांना अेसी पाईप टाकण्यात आलेल्या आहेत व या काळात जे लोक बिमार पडले आहे त्यास जबाबदार कोण नागरीकाची प्रशासन माफी मागणार आहे का याचाही खुलासा करावा.

श्री.वसंत नरवडे :गेल्या सात वर्षाच्या काळात शासनाचे निर्देश शासनाने नियुक्त केलेले अधिकारी हे शासनाच्या आदेशाकडे दुर्लक्ष करीत असतील व जनतेचे आयुष्य धोक्यात येत असतील तर अेसी पाईप ज्या ज्या आयुक्तांच्या कार्यकाळात टाकण्यात आलेल्या आहेत त्या त्या आयुक्तांवर कार्यवाही झाली पाहिजे. तसा ठराव पास करून शासनाकडे पाठवावा.केवळ महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यानां दोषी ठरवू नये.

श्री.अ.रशीद खान :जूनी पाईल लाईन काढली जाते. त्या कोठे आहेत. किती विक्री केलेल्या आहेत केल्या असतील तर लेखा विभागात रक्कम भरणा केलेली आहेत का किती रक्कम जमा झालेली आहे. जे लोक बिमार पडले त्याबध्दल माफी मागणार आहे का.

श्री.कोकाटे काशिनाथ :१९९० साली सिडको भागात ज्या जलवाहिन्याहोत्या त्या जी.आय च्या होत्या महानगरपालिकेने कोटयावधी रूपयाच्या जी.आय बदलून अेसी पाईप टाकल्या तर त्या का टाकण्यात आल्या याचाही खुलासा करावा.

मा.महापौर :या संदर्भात शहर अभियंता यांनी खुलासा करावा.

शहर अभियंता :१९९० मधे ज्या जीआय पाईप लाईन होत्या त्या रिप्लेस केलेल्या आहेत ही वस्तूस्थिती आहे.जीआय पाईप काढून अेसी टाकलेल्या आहेत त्याचे कारण असे होते की सिडकोने ज्या पाईप लाईन टाकलेल्या होत्या त्या कमी व्यासाच्या अेसी पाईप महानगरपालिकेत वापरण्यात येत होते म्हणून त्या टाकण्यात आलेल्या होत्या ही सत्य परीस्थिती आहे.

श्री.सलीम पटेल :शासनाचे आदेश आल्यानंतरही अेसी पाईप सिडको भागात टाकण्यात आलेले आहे अशी माझी माहिती आहे.

श्री.कोकाटे काशिनाथ : एन ११ जे सेक्टर नवजीवन कॉलनी मधे अेसी पाईप टाकण्यात आलेल्या आहेत. एन १२ भागातही अेसी पाईप टाकण्यात आलेले आहे तसेच इतर ही ठिकाणी टाकलेल्या आहेत. व जुने पाईप कोठे आहे याचाही खुलासा व्हावा. करोडे रूपये नागरीकांचे व्यर्थ खर्च करण्याचे काम प्रशासन करीत आहे. करावा.

श्री.सलीम पटेल :प्रस्ताव मंजूर करून चौकशी करण्यात यावी.

मा.महापौर :मा.आयुक्तांनी या संदर्भात खुलासा केलेला आहे हा प्रस्ताव मंजूर केल्यास ४५ दिवसात कामे होतील असे प्रशासनाने खुलासा केलेला आहे. लेबर चार्जेस पॅरलल टेंडरही काढणार आहे.

| | |
|---|---|
| श्री.संजय सिरसाट | :आताच स.सदस्य श्री. कोकाटे काशिनाथ यांनी सांगितले की प्रशासनास आदेश देवूनही कार्यवाही होत नाही. अधिकाऱ्यांनी मनमानी केलेली आहे. अनेक पाईप लाईन बदलल्या आहेत. जून्या पाईप लाईन कोठे आहे याचा हिशोब नाही असे त्यांनी म्हटले आहे. या सर्व प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे. अशी विनंती आहे. |
| मा.उपमहापौर | :मा.सभापती यांनी अत्यंत महत्वाचा व नागरीकांच्या जिव्हाळयाचा प्रश्नमांडलेला आहे. एसी किंवा डीआयके यावरत्याचा वाद नाही परंतू जो विकास कामासाठी विलंब लावलेला आहे.प्रशासनाकडे नियोजन नाही त्यावर त्याचे मत त्यांनी व्यक्त केलेले आहे. पाणी पुरवठयाची ही कामे किती दिवसात सुरू करणार आहे. आम्ही जनतेला काय उत्तरे दयायची हा विषय महत्वाचा आहे. प्रशासनाने तसे आश्वासन दयावे व हा ठराव मंजूर करण्यात यावा. |
| शहर अभियंता | :प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर आठ दिवसात निविदा काढण्यात येईल. निविदा आल्यानंतर त्यानंतर स्थायी समितीची मान्यता घेतली जाईल व त्यानंतर त्वरीत पाईप मागवून घेतले जातील. त्याच बरोबर लेबर रेटचे टैंडर सुध्दा काढण्यात येतील. यानंतर त्वरीत कामास सुरूवात होईल.दोन ते अडीच महिन्याचा कालावधी काम सुरू होण्यासाठी लागेल. |
| श्री.वसंत नरवडे | :हा प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर नियोजन पध्दतीने काम होणार की वाटेल तेथे पाईप टाकणार आहे.दोन्ही बाजूने एसी पाईप व त्यामधेच डीआयके पाईल टाकल्यास एसी पाईपचा दोष या लाईनमधे येवू शकतो त्यासाठी नियोजन करण्यात यावे त्यानुसार कार्यवाही व्हावी. |
| श्री.कोकाटे काशिनाथ | :हे काम करतांना नियोजन काय करणार आहे हा खुलासा पाहिजे. प्रशासन हे कार्यक्षमतेवर चालते अनेक भागातून बेटरमेट चार्जेस भरणा केलेले आहे. तरी ही त्या वसाहतींना पाणी दिलेले नाही. त्याचे कारण म्हणजे प्रशासनाकडे कोणतेही नियोजन नाही.अनधिकृतच्या नावाखाली पाणी दिले जात नाही.विकास कामा संबधीचे अंदाजपत्रक होण्यास नऊ महिने लागत असतील तर दुदैव आहे नैतिका नाही.सदर प्रस्ताव मंजूर करावा विशिष्ट कालावधी देण्यात यावा. |
| श्री.संजय सिरसाट | : ज्यांनी बेटरमेंट चार्जेस भरणा केले. प्लॅन मंजूर करून घेतले बांधकाम परवानगी घेतली मोठमोठया इमारती झाल्या त्यांना पाणी दिले जात नाही. |
| श्री. वसंत नरवडे | :यापूढे नियोजन पध्दतीनेकाम करण्यात यावे सकाळी दुरध्वनी केले असता अधिकारी यांचे दुरध्वनी बंद असतात मोबाईल बंद असतात. पाणी सोडण्याच्या वेळात त्या त्या भागात मा.आयुक्तांनी प्रत्यक्ष भेट दिल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही. लाईनमनच्या भरवशावर काम चालू आहे. |
| मा.आयुक्त | :जो प्रस्ताव ठैवलेला आहे त्यानुसार कामे होतील वेळकाढपणा यात नाही. पूर्णपणे मेहनत करून हा प्रस्ताव सादर केलेला आहे.२महिन्याच्या आत कामे सुरू होतील |
| श्री.कोकाटे काशिनाथ | : कोणत्या भागात किती ठिकाणी एसी पाईप आहे किती ठिकाणी बदलावयाच्या आहेत. त्याचे इस्टिमेंट तयार असतांना एवढा वेळा का लागलेला आहे. पाणी पुरवठा संबंधी लोकसंख्येचा तक्ता, नकाशे असावे, २ वर्षाची योजना त्याचे नकाशे असणे आवश्यक आहे. |
| मा.महापौर | :मा.आयुक्त यांनी आताच खुलासा केला दोन महिण्यात कामे सूरू होतील. प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे. |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,औरंगाबाद शहरातील विविध ठिकाणी जुन्या जलवाहिन्या काढून त्या ठिकाणी नविन जलवाहिन्या टाकण्याकरीता तसेच दाट लोकवस्तीतील जुन्या खराब झालेल्या व दुषीत

पाण्याच्या तक्रारी ज्याभागातून जास्त येत आहे,अशा ठिकाणी जलवाहिन्या टाकण्याच्या विविध कामांना लागणारे डी.आय.के. (D.I.K-7&K-9Pipe) पाईप एकत्रीत खरेदी करणेच्या र.रू.४,०३,२५,८२४/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०६/९ :**

कार्यकारी अभियंता , पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेवर महत्वाकांक्षी प्रकल्प पुर्ण करण्याचे दृष्टीने श्री. जी.बी. जावळे (निवृत्त उप अभियंता )यांची महानगरपालिकेमार्फत रूपये १२,०००/-प्रतिमहा मानधनावर ११ महिन्याच्या कालावधीकरीता मा.सर्वसाधारण सभा दिनांक २०.१०.२००४ व मा. स्थायी समिती सभा दिनांक १९.०८.२००४ मधील मंजूरीनुसार तांत्रिक सल्लागार म्हणुन नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदरच्या नियुक्तीनसार श्री. जी.बी. जावळे हे तांत्रिक सल्लागार म्हणून महानगरपालिका सेवेत दिनांक ०१.०१.२००५ पासून रूज झाले. त्यांचा ११ महिन्याचा कालावधी दिनांक ३०.११.२००५ रोजी संपत आहे..

श्री.जी.बी . जावळे (तांत्रिक सल्लागार)यांच्या ११ महिन्याच्या कालावधीत पाणी पुरवठा योजने अंतर्गत पाणी परिमाण वाढविणे, उर्जा व लेखा परिक्षण कार्यक्रम राबविणे, वितरण व्यवस्थेत सुसूत्रीकरण आणणे इत्यादी बाबतीत त्यांचा तांत्रिक सल्ला महानगरपालिकेस फायदयाचा ठरला आहे

याच कालावधीत महानगरपालिकेतर्फे नवीन समांतर पाणी पुरवठा योजने करीता प्रकल्प संकल्पनार्थीची (PMC) ची निवड करणे , समांतर योजना **BOOT** तत्वावर राबविणे इत्यादी कामे हाती घेण्यात आली असून या कामाकरीता निविदा प्रक्रिया चालू आहे. या कामाकरीता श्री. जी. बी. जावळे यांचा तांत्रिक सल्ला महानगरपालिके करीता महत्वाचा आहे.

श्री.जी.बी.जावळे यांचा सल्लागाराचा कालावधी दिनांक ३०.११.२००५ रोजी संपत असून पुढील कालावधी करीता त्यांच्या सेवेची महानगरपालिका कार्यालयास आवश्यकता आहे.

करीता श्री.जी.बी.जावळे, तांत्रिक सल्लागार यांना दिनांक १.१२.२००५ पासून पुढे ११ महिन्याच्या कालावधी करीता त्यांच्या सध्याच्या मानधनावर व पुर्वीच्याच अटी शर्तीच्या अधीन राहून नियुक्त करण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.अ.रशिद खान :महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना संबधीत अधिकारी यांनी काय सल्ला दिलेला आहे याची माहिती देण्यात यावी.

मा.महापौर :या बाबतीत संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

शहरअभियंता :श्री.जी.बी.जावळे हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडिल उपअभियंता होते, महानगरपालिकेत ते कनिष्ठ अभियंता म्हणून प्रतिनियुक्तीवर होते. त्यानंतर ते महानगरपालिकेतच उपअभियंता म्हणून कार्यरत होते.महानगरपालिकेची १२०० मी.मी. व्यासाची मोठी जलवाहिनीवर त्यांनी बऱ्याच दिवसापासून काम केलेले आहे. ते आता सेवा निवृत्त असून महानगरपालिका समांतर जलवाहिनी टाकण्याची योजना राबविणार आहे. त्यांना या संदर्भात बरीचशी माहिती आहे. त्यांचेकडे इतर कोणतेही महानगरपालिकेचे काम नाही. जी समांतर जलवाहिनी टाकण्याची योजना करीत आहोत. हे फार मोठे काम आहे. व्यवस्थित काम करतील म्हणून त्याची आवश्यकता आहे.

श्री.अ.रशिद खान : सन १९९८ पासून श्री. जी.बी जावळे हे महानगरपालिकेत कार्यरत आहे. तेंव्हापासून महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी त्यांचेकडून कामाची माहिती का करून घेतलेली नाही. आज ते आहेत भविष्यात त्यांची काम करण्याची इच्छा नसेल तर त्यानंतर कोण सल्ला देणार आहे असा प्रश्न पडतो. त्यांचेकडून आतापर्यत काय माहिती करून घेतलेली आहे

श्री.संजय सिरसाट :पाणी प्रश्न हा महत्वाचा भाग आहे. संमातर जलवाहिनी असेल किंवा पाणी पूरवठया संबधीत जी इतर कामे असतील. त्यासाठी तांत्रिक सल्लागार व्यक्तीची आवश्यकता असते. संबधीत अधिकारी यांनी सेवेत असतांना चांगले काम केलेले आहे. एक वर्षाची मुदतवाढ देण्यात यावी.

श्री.अ.रशिद खान :दुर्दैवाने म्हणावे लागते अधिकाऱ्यांनी I सल्ला घेतला नाही. म्हणून प्रस्ताव पास करावा लागतो.

मा.उपमहापौर : ठराव मंजूरीसाठी येतो व प्रत्येक वेळी प्रशासनाने असे म्हटले की यावेळेस अधिकारी त्यांचेकडून प्रशिक्षण घेतील. किती वर्ष अशी मुदतवाढ देणार आहे.केंव्हा महानगरपालिकेचे अधिकारी प्रशिक्षित होणार आहे महानगरपालिकेकडे टेक्नीकल कर्मचारीच नाही का? जर समांतर जलवाहिनीसाठी पीएमसी नियुक्त करणार आहोत. तर तांत्रिक सल्लागार यांची गरज काय असणार आहे. पी.एमसीचे कार्य काय असते. याचा सुध्दा खुलासा करण्यात यावा.

श्री.संजय सिरसाट :महानगरपालिकेत अनेक बाबीची कमतरता असून म्हणूनच इतर अधिकारी सुध्दा डेप्यूटेशनवर येथे काम करीत आहेत. ही अंतर्गत मजबूरी असून जे चांगले काम करीत असेल तर त्यांना घ्यावे असे माझे मत आहे.

श्री.सलीम पटेल :समांतर जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी त्यांना नियुक्त करावे. ११ महिण्यासाठीच घेवू नये.

मा.महापौर : विषय मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.जी.बी.जावळे, तांत्रिक सल्लागार यांना दिनांक १.१२.२००५ पासून पुढे ११ महिन्याच्या कालावधी करीता त्यांच्या सध्याच्या मानधनावर व पुर्वीच्याच अटी शर्तीच्या अधीन राहून नियुक्ती देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**स.सदस्यांचे प्रस्ताव**

**विषय क्र. १०७/१० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका हद्दीमध्ये असलेल्या कब्रस्तानात दफनविधीच्या वेळी कब्रस्तानाचा परवाना देण्याकरीता कब्रस्तानात चौकीदार नसल्यामुळे नागरीकांची गैरसोय होते. त्यामुळे नागरीकांना कब्रस्तान परवान्याची सुविधा मिळावी यासाठी शहरातील प्रत्येक कब्रस्तानात एका चौकीदाराची नियुक्ती करण्यात यावी.तसेच सुरक्षेच्या दृष्टीने चौकीदाराकरीता कब्रस्तानात एक रूम बांधण्यात यावी. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : जावेद हसन खान, सैय्यद खुसरो अनुमोदक : हाजी शेरखाँ, श्रीमती मेहरून्नीसा बेगम

श्री.संजय जोशी : प्रस्तावाचे सुचक, अनुमोदक उपस्थित नाही.

मा.महापौर : स्थगित करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावाचे सूचक व अनुमोदक उपस्थित नसल्यामूळे स्थगित करण्यांत आला.

**विषय क्र. १०८/११ :**

वॉर्ड क्र.९४ बन्सीलालनगर अंतर्गत राहुलनगर भागात स्वेच्छा निधीतून आर.सी.सी. कमान उभारण्यात यावी. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.अल्पा विकास जैन अनुमोदक : रेणुकादास वैद्य

मा.महापौर :प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.९४ बन्सीलालनगर अंतर्गत राहुलनगर भागात स्वेच्छा निधीतून आर.सी.सी. कमान उभारण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०९/१२ :**

सन २००५-२००६ च्या अर्थसंकल्पातील पान क्र.१२६ अ.क्र.६ वरील 'स्लम भागात ड्रेनेज लाईन टाकणे साठी रू.४.०० लक्ष' तरतुद आहेत. या कामाऐवजी '**वार्ड क्र.८ मध्ये विविध ठिकाणी स्ट्रीट लाईट फिक्चर, विद्युत खांब इ. कामाकरीतारू.४.०० लक्ष'** वळती करण्यात यावी. त्याप्रमाणे लेखाशिर्ष बदल करण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : तरविंदरसिंग धिल्लन अनुमोदक : मिलींद दाभाडे, श्रीमती अलका पाटील

मा.महापौर : प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००५-२००६ च्या अर्थसंकल्पातील पान क्र.१२६ अ.क्र.६ वरील स्लम भागात ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाच्या तरतूदीचे लेखाशिर्ष बदलून त्याऐवजी वार्ड क्र.८ मध्ये विविध ठिकाणी स्ट्रीट लाईट फिक्चर, विद्युत खांब इ. कामाकरीता र.रू.४.०० लक्ष वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११०/१३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पैठणगेट, औरंगपुरा, गुलमंडी हा भाग अत्यंत जुन्या वसाहतींपैकी असून तेथील रस्त्यांचे रूंदीकरण अद्यापही झालेले नाही. शहरातील लोकसंख्येत लक्षणीय वाढ झालेली असून या भागात शहराची मुख्य बाजारपेठ असून अत्यंत रहदारी वाढलेली आहे. सायंकाळच्या वेळेला गर्दीमुळे पादचाऱ्यांना चालणे देखील कठीण होत आहे. शिवाय वाहने चालवणे देखील अडचणीचे होत आहे.

शहराची विकास योजना प्रथमत: १९६९ साली मंजूर झाली तेंव्हा पासून पैठणगेट ते बाराभाई ताजीया पर्यत १५मीटर आणि बाराभाई ताजीया ते औरंगपूरा पोलीस चौकी पर्यंत १८ मीटर रूंद रस्ते विकास योजनेत प्रस्तावित केलेले आहे. या रस्त्यावरील रहदारी पाहता सदर रस्त्याचे तातडीने भुंसपादन होणे आवश्यक आहे. तसेच विकास योजना सुधारीत २००२ दिनांक १७.८.२००२ मध्ये मंजूर झालेले असून या सुधारित विकास योजनेतही सदर रस्ते १५मीटर रूंद व १८ मीटर रूंद अनुक्रमे प्रस्तावित केलेले असून आज विदयमान सुमारे २५ ते३० फुटाचे रस्ते आहेत. तरी सदर रस्त्यांचे तातडीने भुसंपादन करणे आवश्यक असल्याने भुसंपादन अधिनियम १८९४ चे कलम १७ आणि महाराष्ट प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२९ अन्वये तातडीने भुसंपादन करणेस आणि या रस्त्याने बाधीत मिळकतीचा अगाऊ ताबा घेणेची कार्यवाही करण्याकरीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : संजय शिरसाट अनुमोदक : काशिनाथ कोकाटे

श्री.वसंत नरवडे :पैठणगेट . गुलमंडी औरंगपूरा यात दोन वार्डचा भाग येतो. जुन्या वसाहतीत रस्त्यांचे रूंदीकरण झालेले नाही असे नमूद केलेले आहे कोणत्या भागातील राहिलेले आहे. संबधीत अधिकारी यांचेकडून माहिती घेण्यात यावी.

मा.महापौर :प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पैठणगेट ते बाराभाई ताजीया पर्यत १५ मीटर आणि बाराभाई ताजीया ते औरंगपूरा पोलीस चौकी पर्यंत १८ मीटर रूंद रस्ते सुधारीत विकास योजना २००२ दिनांक १७.८.२००२ मध्ये मंजूर झालेल्या रस्त्यांचे भूसंपादन अधिनियम १८९४ चे कलम १७ आणि महाराष्ट प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२९ अन्वये भूसंपादन करणेस आणि या रस्त्याने बाधीत मिळकतीचा अगाऊ ताबा घेणेची कार्यवाही करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र १११/१४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र ९३ वेदांतनगर अंतर्गत रचनाकार कॉलनी, एम.आय.डी.सी. कॉर्नर ते गाडगेनगर, आय.टी.आय ते एम.आय.डी.सी रस्ता, या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २००४-२००५ च्या दरसुचीप्रमाणे तयार

करण्यात आलेले असुन कामाचे अंदाजपत्रक रूपये २६,९९,८००/- चे आहे. प्रस्तावित कामांकरीता सन २००५-२००६ च्या अर्थसंकल्पात आर्थिक तरतूद उपलब्ध केलेली आहे.

तरी उपरोक्त कामाच्या रू.२६.९९.८००/- च्या अंदाजपत्रकास मंजूरी मिळण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.संजय जोशी : रस्त्याचे नेमके काय काम करणार आहे. याचा बोध होत नाही. माहिती देण्यात यावी.

अति.शहर अभियंता :प्रभाग क्र ९३ मध्ये जे प्रस्तावात नमूद केलेले आहे त्या संपूर्ण भागात ज्या कॉलनी येतात त्या भागात रस्त्याचे डांबरीकरणाचे काम करणार आहेत. प्रस्तावात रेल्वेस्टेशन एमआयडीसी रस्ता असे वाचण्यात यावे.

मा.महापौर : प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहेत प्रशासकीय काही प्रस्ताव आहेत त्यास व इतर सदस्यांचे ऐनवेळेचे जे प्रस्ताव आहेत, या सर्व प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र ९३ वेदांतनगर अंतर्गत रचनाकार कॉलनी, एम.आय.डी.सी. कॉर्नर ते गाडगेनगर,आय.टी.आय ते एम.आय.डी.सी.या रस्त्याच्या कामाच्या र.रू.२६,९९,८००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र. ११२/१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिनांक २५/१०/२००५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेमध्ये ठराव क्र.१०५ अन्वये अर्थसंकल्पातील पृष्ट क्र.१९० वरील विद्युत साहित्य खरेदी या लेखाशीर्षाखाली 'शहरातील पथदिव्यांसाठी आवश्यकतेनुसार साहित्य खरेदी करणे-७०.०० लक्ष' च्या तरतूदीमधून र.रू.५०.०० लक्ष (पन्नास लाख रूपये) वळती करून 'विद्युत देखभाल दुरूस्ती' या लेखाशिर्षकात समावेश करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आलेली आहे. करीता आर्थिक तरतूद वळती करण्यासंबंधीचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक २५/१०/२००५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेमध्ये ठराव क्र.१०५ अन्वये अर्थसंकल्पातील पृष्ट क्र.१९० वरील विद्युत साहित्य खरेदी या लेखाशीर्षाखाली 'शहरातील पथदिव्यांसाठी आवश्यकतेनुसार साहित्य खरेदी करणे-७०.०० लक्ष' च्या तरतूदीमधून र.रू.५०.०० लक्ष (पन्नास लाख रूपये) वळती करून 'विद्युत देखभाल दुरूस्ती' या लेखाशिर्षकात समावेश करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११३/२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २००५-०६ च्या अर्थसंकल्पात पृष्ट क्रं.१८६ आणि अ.क्र.६ वर शरीफ कॉलनी येथील नाल्यातील चोकप झालेली मेन सिव्हर लाईन अप्रुटींग करणे या कामासाठी पाच लक्ष रू.ची तरतूद करण्यात आलेली आहे. परंतु सदरील काम जास्त निकडीचे नसल्याने सदरील काम रद्द करून प्रभागात ठिकठिकाणी सोडीयम व्हेपर दिवे लावण्यासाठी २,००,०००/- (दोन लक्ष रू.ची) तरतूद करावी तसेच ट्युबलर पोल्स लावण्यासाठी रक्कम रूपये ३,००,०००/- (तीन लक्ष रू.) ची तरतूद करण्यात यावी. करिता प्रस्ताव मंजूरीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सर्वसाधारण सभेत सादर.

सूचक : श्री.निसारखॉ मोहमदखॉ अनुमोदक : श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००५-०६ च्या अर्थसंकल्पात पृष्ट क्रं.१८६ आणि अ.क्र.६ वर शरीफ कॉलनी येथील नाल्यातील चोकप झालेली मेन सिव्हर लाईन अप्रुटींग करणे या कामासाठी ठेवण्यात

आलेली र.रू.५.०० लक्ष तरतूदीचे लेखा शिर्ष बदलून प्रभागात ठिकठिकाणी सोडीयम व्हेपर दिवे लावण्यासाठी र.रू.२.०० लक्ष व ट्युबलर पोल्स लावण्यासाठी र.रू.३.०० ची तरतूद करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११४/३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहराच्या जुन्या हद्दीसाठी मंजूर झालेल्या सुधारीत विकास योजनेमध्ये सिल्क मिल कॉलनी लगत नगर भूमापन क्रमांक-१८७६२ ते १८७६५ ही मिळकत औद्योगिक क्षेत्रात दर्शविण्यात आलेली आहे. सदर वसाहती लगतचा संपूर्ण परीसर विद्यमान निवास वापरात असून फक्त याच मिळकती औद्योगिक वापरासाठी दर्शविण्यात आलेले आहेत. सध्या या मिळकतीमध्ये देखील विद्यमान वापर चालू नाही. व असलेले कारखाने मोडकळीस आलेले असून त्या ठिकाणी लगतचा भाग पूर्णत: निवासी वापरासाठी विकसीत झाल्यामूळे व मंजूर विकास योजनेत देखील परिसराचा भाग देखील निवास वापरात दर्शविण्यात आलेला आहे. संबंधित जमीन मालकाने महानगरपालिकेकडे व शासनाकडे देखील या जमिनीवर निवासी वापर अनुज्ञेय करण्याची विनंती केलेली आहे.

तरी या परिसरात निवास वापराची पोटेंशनलिटी असल्याने आणि संपूर्ण परिसर निवास वापरासाठी विकसीत असल्याने न.भू.क्र.१८७६२ ते १८७६५ या चार मिळकती निवास भागात सामिल केल्यानंतर संपूर्ण भाग हा निवासी क्षेत्र म्हणून राहिल. तरी न.भू.क्र.१८७६२ ते १८७६५ या मिळकती सुधारीत मंजूर विकास योजनेतील औद्योगिक क्षेत्रातून वगळून निवास क्षेत्रात समाविष्ट करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम-३७ अन्वये फेरबदल करण्याकरीता आणि सदर फेरबदलाची संपूर्ण कार्यवाही, जसे अधिसूचना काढणे, सूनावणी देणे, व अंतिम प्रस्ताव शासनास सादर करण्याचे संपूर्ण अधिकार आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रदान करणे बाबतचा प्रस्ताव स्विकृतीसह सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सूचक : श्री.भगवान घडमोडे अनुमोदक : श्री.रशिद खान मामु

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिल्क मिल कॉलनी लगत नगर भूमापन क्रमांक-१८७६२ ते १८७६५ या मिळकती सुधारीत मंजूर विकास योजनेत औद्योगिक क्षेत्रात दर्शविण्यात आलेली आहे. या मिळकती औद्योगिक क्षेत्रातून वगळून निवास क्षेत्रात समाविष्ट करण्यांस महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम-३७ अन्वये फेरबदल करण्याकरीता आणि सदर फेरबदलाची संपूर्ण कार्यवाही, जसे अधिसूचना काढणे, सूनावणी देणे, व अंतिम प्रस्ताव शासनास सादर करण्याचे संपूर्ण अधिकार आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रदान करणेस स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११५/४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मोहल्ला जुनाबाजार सर्व्हे क्र.-६२ येथील खूली जागा ही पार्क या आरक्षणाखाली आरक्षित असून सदरील खूल्या जागेत पार्क/उद्यान विकसीत करण्यासाठी महानगरपालिका अर्थसंकल्प सन २००५-२००६ मध्ये पा.क्र.१३१ वर नविन उद्याने या लेखाशिर्षका अंतर्गत अ.क्र.-१३ नुसार रूपये २५.०० लक्षची तरतूद करण्यात आलेली आहे.

सदरील खूल्या जागेत अद्यावत व परीपूर्ण पार्क/उद्यान विकसीत करणे आवश्यक असल्याने त्यासाठीचे अंदाजपत्रक संबंधित विभागाने तयार केले असून सदर अंदाजपत्रक रक्कम रूपये ५०.०० लक्षचे तयार करण्यात आलेले आहे. सदरील पार्क नियोजनबध्दरितीने व अद्यावत करणे आवश्यक असल्याने परीपूर्ण कामासाठी उपलब्ध तरतूद ही कमी असल्याने पुरक तरतूद आवश्यक असल्याने महानगरपालिका अर्थसंकल्प सन २००५-०६ मधील पा.क्र.-१३५ वरील विकास योजना भूखंडाचे संरक्षण या लेखाशिर्षका अंतर्गत अ.क्र.३९ नुसार उपलब्ध रक्कम रूपये १०.०० लक्ष पार्कच्या कामासाठी वर्ग करणे योग्य व तसेच

उर्वरीत आवश्यक रक्कम रूपये १५.०० लक्षची तरतूद पुढील आर्थिक वर्ष सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पात सदर कामासाठी तरतूद करण्याचे प्रस्तावित करण्यात येईल.

त्यानुसार मोहल्ला जुनाबाजार सर्व्हे क्र.-६२ येथील खुली जागा ही पार्क म्हणून विकसीत करण्यासाठीचे संबंधित विभागाने तयार केलेले रक्कम रूपये ५०.०० लक्षचे अंदाजपत्रकासाठी पूरक तरतूद म्हणून उपरोक्त अनुसार कार्यवाही करणे योग्य.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सूचक : श्री.संजय शिरसाट　　　　　　　　　　अनुमोदक : श्री.भगवान घडमोडे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोहल्ला जुनाबाजार सर्व्हे क्र.-६२ येथील आरक्षित असलेल्या खूल्या जागेवर अद्यावत व परीपूर्ण पार्क/उद्यान विकसीत करण्यासाठी संबंधित विभागाने र.रू.५०.०० लक्षाचे अंदाजपत्रक तयार केले आहे. सदरील पार्क/उद्यानासाठी अर्थसंकल्प सन २००५-२००६ मध्ये पा.क्र.१३१ वर नविन उद्याने या लेखाशिर्षका अंतर्गत अ.क्र.-१३ नुसार रूपये २५.०० लक्षची करण्यात आलेली तरतूद कमी पडत असल्याने अर्थसंकल्प सन २००५-०६ मधील पा.क्र.-१३५ वरील विकास योजना भूखंडाचे संरक्षण या लेखाशिर्षका अंतर्गत अ.क्र.३९ नुसार उपलब्ध रक्कम रूपये १०.०० लक्ष पार्कच्या कामासाठी वर्ग करणेस तसेच उर्वरीत आवश्यक रक्कम रूपये १५.०० लक्षची तरतूद पुढील आर्थिक वर्ष सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पात सदर कामासाठी तरतूद करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११६/५ :**

कार्यकारी अभियंता (ड्रेनेज,विद्युत,इमारती व उद्याने) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.हर्सूल येथे नव्याने विकसित होत असलेल्या निवासी वसाहतीसाठी मुख्य जलनि:स्सारण वाहीनीचे 'मयुर पार्क हर्सूल येथे ३०० मि.मि.व्यासाची मेन सिवर लाईन टाकणे' या कामाचे अंदाजपत्रक रूपये २५,००,०००/- चे तयार करण्यात आले. यास सर्वसाधारण सभा दिनांक २०.१२.२००४ चे विषय क्रमांक २०६/०३ अन्वये मान्यता मिळाली आहे.त्यानुसार सदरील कामाची निविदा दि.२७/०५/२००४रोजीच्या स्थायी समितीतील ऐनवेळचे विषय क्र.२४ अन्वये अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३३.३३५% कमी दराने मे.रत्नगुरू कन्स्ट्रक्शन्स यांचेकडून करून घेण्यास स्विकृतीसह मान्यता प्राप्त झाली आहे.

सदरील अंदाजपत्रक तयार करतांना मुख्य जलनि:स्सारण वाहिनीचे Alignment व वाहिनीची लांबी प्रत्यक्षात काम करतांना आवश्यक उतार प्राप्त होण्यासाठी बदलून व मुख्य जलनि:स्सारण वाहिनीची लांबी वाढविणे आवश्यक आहे. त्यामुळे अंदाजपत्रकातील केलेल्या तरतूदी व परिमाणामध्ये वाढ होत आहे. त्यामुळे सदरील कामासाठी मूळ अंदाजपत्रकापेक्षा रू.५,२२,९४५/- ची वाढीव तरतूद करणे आवश्यक आहे.सदरील कामासाठी मूळ अंदाजपत्रक रू.२५,००,०००/- + वाढीव तरतूद रू.५,२२,९४५/- अशा एकत्रित रूपये ३०,२२,९४५/- चा सुधारीत अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांची प्रशासकीय मान्यता दिनांक १४.११.२००५ रोजी प्राप्त झाली आहे.

सदरील कामाच्या मूळ अंदाजपत्रकास सक्षम सभेची किंवा सक्षम अधिकारी यांची प्रशासकीय मंजूरी प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्षात काम करतेवेळी अपरिहार्य कारणास्तव १०% पेक्षा जास्त वाढ होत असल्यास अशा कामाच्या बाबतीत सुधारीत मंजूरी प्राप्त करणे आवश्यक आहे.

करीता वाढीव तरतूदीसह सुधारीत अंदाजपत्रक रूपये ३०,२२,९४५/- मंजूरीस्तव तसेच मे.रत्नगुरू कन्स्ट्रक्शन यांच्याकडून मंजूर निविदा दराने म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३३.३३५% कमी दराने करून घेण्याचा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.हर्सूल येथे नव्याने विकसित होत असलेल्या निवासी वसाहतीसाठी मुख्य जलनि:स्सारण वाहीनीचे मयुर पार्क हर्सूल येथे ३०० मि.मि.व्यासाची मेन सिवर लाईन टाकणेच्या

कामाचे रक्कम रूपये ३०,२२,९४५/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास तसेच मे.रत्नगुरू कन्स्ट्रक्शन यांच्याकडून मंजूर निविदा दराने म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३३.३३५% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११७/६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २००५-२००६ च्या अर्थसंकल्पात पृष्ट क्र.१५१ अ.क्र.१११ वर 'रोशनगेट ते शरीफ कॉलनी दर्ग्यापर्यंत रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे' या कामासाठी ३,००,०००/- तीन लक्ष रू.ची तरतूद करण्यात आली आहे. परंतू सदरील काम हे महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाकडून करण्यात येणार आहे. करीता या कामासाठी ठेवण्यात आलेल्या तरतूदीतुन अरफात कब्रस्तान संरक्षक भिंतीची दुरूस्ती करण्यासाठी उंची वाढविणे व गेट बसविण्यासाठी २,००,०००/- दोन लक्ष रू.ची तरतूद करावी. तसेच रक्कम रू.१,००,०००/- एक लक्ष रूपये प्रभाग क्र.४३ मधील विविध गल्ल्यामधील फरशी दुरूस्ती व कॉक्रींटीग करण्यासाठी वापरण्यात यावे. करिता मंजूरीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत सादर.

सूचक : श्री.निसारखॉ महमदखॉ अनुमोदक : श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००५-२००६ च्या अर्थसंकल्पात पृष्ट क्र.१५१ अ.क्र.१११ वर रोशनगेट ते शरीफ कॉलनी दर्ग्यापर्यंत रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे या कामासाठी ठेवण्यात आलेली र.रू.३.०० लक्ष तरतूदीचे लेखा शिर्ष बदलून अरफात कब्रस्तान संरक्षक भिंतीची दुरूस्ती करण्यासाठी उंची वाढविणे व गेट बसविण्यासाठी र.रू.२.०० लक्ष व र.रू.१.०० लक्ष प्रभाग क्र.४३ मधील विविध गल्ल्यामधील फरशी दुरूस्ती व कॉक्रींटीग करण्यासाठी वापरण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११८/७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका महिला बाल कल्याण समितीच्या सदस्यांना मुंबई, पुणे व केरळ येथे अभ्यास दौरासाठी जावयाचे आहे. या अभ्यास दौऱ्यामूळे केरळ येथील महिला व बाल कल्याण तसेच महानगरपालिकेचे कार्य कशा पध्दतीने उत्कृष्टपणे केले जाऊ शकेल. सदरील अभ्यास दौऱ्यात महिला बाल कल्याण समितीच्या सदस्यांचा व संबंधित अधिकाऱ्यांचा समावेश असेल अभ्यास दौऱ्यासाठी येणाऱ्या खर्चाची तजवीज महिला बाल कल्याण समितीच्या अर्थसंकल्पीय तरतूदीमधून करण्यात यावी, तरी हा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

सूचक : सौ.अंजली कोंडेकर अनुमोदक : सौ.दिपाली पाटील

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका महिला बाल कल्याण समितीच्या सदस्यांना मुंबई, पुणे व केरळ येथे अभ्यास दौरा करण्यास व दौऱ्यासाठी संबंधीत अधिकाऱ्याचा समावेश करणेस आणि या दौऱ्यासाठी येणारा खर्च हा महिला व बाल कल्याण समितीच्या अर्थसंकल्पीय तरतूदीमधून करण्यासही सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११९/८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कर्नाटक सरकारने संयूक्त महाराष्ट्राच्या ५० व्या वर्धापन दिनीच मराठी अस्मितेवर घाला घालून तमाम मराठी प्रेमींचा अवमान केला आहे. बेळगांव येथील जनतेच्या मनात होते की, बेळगांव हे महाराष्ट्रात विलीन व्हावे. परंतु कर्नाटक सरकारने असे न करता, स्थानिक जनतेचा विचार न करता महापालिका बरखास्त केली व मराठी माणसावर अन्याय केला, ही बाब अत्यंत अन्याय करणारी असल्यामूळे या सभागृहाने कर्नाटक सरकारचा एकमुखाने निषेध नोंदवावा, व तसे कर्नाटक सरकारला कळवावे. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

सूचक : श्री.काशिनाथ कोकाटे

अनुमोदक : श्री.संजय शिरसाट, श्री.रेणुकादास वैद्य, सौ.लता दलाल, डॉ.आशा बिनवडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कर्नाटक सरकारने बेळगांव महापालिका बरखास्त केल्यामूळे कर्नाटक सरकारचा एकमुखाने निषेध करण्यास व तसे कर्नाटक सरकारला कळविण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२०/९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महापालिका गरवारे स्टेडीयममध्ये बॅडमिंटनसाठी वूडन कोर्ट तयार करणेसाठी अर्थसंकल्प २००५-०६ चे पान क्र.१५४ वर रू.२.०० लाखाची तरतूद ठेवलेली आहे. या तरतूदीतून तेथील दोन्ही वूडन कोर्टाचे काम पूर्ण होत नसल्याने पान क्र.१५४ अ.क्र.१ महापालिका गरवारे संकुलाची देखभाल दूरूस्तीसाठीची १ लाखाची तरतूद वळती करण्यास मान्यता मिळावी, प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सूचक : श्री.काशीनाथ हरिभाऊ कोकाटे                    अनुमोदक : श्री.रेणुकादास वैद्य

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महापालिका गरवारे स्टेडीयममध्ये बॅडमिंटनसाठी वूडन कोर्ट तयार करणेसाठी अर्थसंकल्प २००५-०६ चे पान क्र.१५४ वर रू.२.०० लाखाची तरतूद ठेवलेली आहे. या तरतूदीतून तेथील दोन्ही वूडन कोर्टाचे काम पूर्ण होत नसल्याने पान क्र.१५४ अ.क्र.१ महापालिका गरवारे संकुलाची देखभाल दूरूस्तीसाठीची र.रू.१.०० लाखाची तरतूद वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२१/१० :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.) प्रस्ताव सादर करीत आहेत की, वॉर्ड क्रमांक-२६ एन-८ भागामध्ये वेगवेगळ्या संस्थेतंर्गत पूर्वी त्यांनी स्वखर्चाने जवळपास १९८५ च्या पूर्वीपासून जलवाहीन्या टाकण्यात आलेल्या आहेत. सद्याच्या लोकसंख्येनुसार जलवाहीन्या ह्या अपुऱ्या व्यासाच्या आहेत. त्यामुळे बहुतांश सोसायट्यामध्ये पाणी पुरवठा वितरण व्यवस्थीत होण्याच्यादृष्टीने मोठ्या व्यासाच्या जलवाहीन्या टाकणे आवश्यक आहे.

यापूर्वी स्वंयविकास गृहनिर्माण संस्थेतंर्गत स.नगरसेवक यांचे स्वेच्छा निधीतून जलवाहीन्या टाकण्याची कामे पूर्वीच्या सर्वसाधारण सभेच्या ठरावाप्रमाणे झालेली आहे. ह्या कामासाठी अर्थसंकल्पात २००५-०६ मध्ये वॉर्ड क्रमांक २६ मध्ये विविध ठिकाणी जलवाहिन्या टाकण्याच्या कामाची तरतूद आहे.

वॉर्ड क्र.-२६ एन-८ भागामध्ये वेगवेगळ्या गृहनिर्माण संस्थेतंर्गत १०० व १५० मीमी व्यासाचे डी.आय.के.-९ जलवाहीनी टाकण्याचे कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.२४,६१,७५०/- चे सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.-२६ एन-८ भागामध्ये वेगवेगळ्या गृहनिर्माण संस्थेतंर्गत १०० व १५० मीमी व्यासाचे डी.आय.के.-९ जलवाहीनी टाकण्याचे कामाचे र.रू.२४,६१,७५०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२२/१० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वेरूळ येथे दि.२७ नोव्हेबंर ते १२ डिसेबंर दरम्यान श्री.हनुमान धर्मसंस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. या सोहळ्यात लाखो भाविक उपस्थित राहणार आहेत. या काळात केंद्रीय कृषीमंत्री ना.शरदराव पवार, मुख्यमंत्री मा.विलासरावजी देशमुख, उपमुख्यमंत्री मा.आर.आर.पाटील यांच्यासह राज्यमंत्री मंडळातील अनेक मंत्री तसेच भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा लोकसभेतील विरोधी पक्ष नेता मा.ना.लालकृष्णजी आडवाणी, माजी उपमुख्यमंत्री मा.गोपीनाथराव मुंडे व शिवसेनेचे कार्याध्यक्ष मा.उध्दवजी ठाकरे यांच्यासह अनेक सन्माननीय नेते मंडळी उपस्थित राहणार

आहेत. अशा या धर्मसोळ्यासाठी सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून महानगरपालिकेच्या अग्निशामक दलाचे एक वाहन त्यावरील कर्मचाऱ्यांसह उपलब्ध करून द्यावी. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सूचक : श्री.काशिनाथ कोकाटे, श्री.भगवान घडमोडे

अनुमोदक : श्री.संजय शिरसाट, श्री.रेणुकादास वैद्य.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वेरूळ येथे दि.२७ नोव्हेबंर ते १२ डिसेबंर दरम्यान श्री.हनुमान धर्मसंस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. अशा या धर्मसोळ्यासाठी सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून महानगरपालिकेच्या अग्निशामक दलाचे एक वाहन त्यावरील कर्मचाऱ्यांसह उपलब्ध करून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच ‘‘ राष्ट्रगिताने ‘‘ सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद.